
बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)

दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)

ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे





गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१४ गोंदिया | अंक ४४ | बुधवार,दि.८ ऑक्टोबर २०२५ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/104/2025-2027


# आदिवासींच्या आरक्षणात इतर समाजांची घुसखोरी रोखा

## विविध संघटनांचा आक्रोश मोर्चा



### .. या आहेत मागण्या

**बंजारा व इतर कोणत्याही जातीला अनु. जमाती प्रवर्गात सामावून घेऊ नये, राज्यातील अनु. जमातीचा अनुशेष तत्काळ भरण्यात यावा, आदिवासी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना दिली जाणारी डीबीटी योजना बंद करून शासकीय खानावळ सुरू करण्यात यावी, आदिवासींच्या जमिनी गैरआदिवासींना भाडेतत्त्वावर देऊ नयेत, शैक्षणिक किंवा इतर क्षेत्रांमध्ये जातवैधता प्रमाणपत्राशिवाय कोणतेही लाभ देण्यात येऊ नये, ब्रिटिश गॅझेट-हैदराबाद गॅझेटमध्ये उल्लेखीत जातींना अनु. जमातीचा (आदिवासी) दर्जा देऊ नये, जिल्ह्यात आदिवासी सांस्कृतिक भवनकरिता जागा उपलब्ध करून द्यावी, जिल्ह्याला पेसा अधिनियम लागू करण्यात यावा, आदिवासी विकास विभागातील बाह्यस्रोत पदभरती बंद करण्यात यावी, यासह अन्य मागण्यांसाठी आक्रोश मोर्चा काढण्यात आला. विशेष म्हणजे, या आक्रोश मोर्चात आदिवासीबांधवांनी एकीची ताकद दाखवून दिली.**

**गोंदिया:-** आदिवासी समाजाच्या आरक्षणात इतर समाजांकडून होणारी घुसखोरी रोखण्यात यावी, या प्रमुख मागणीसह अन्य मागण्यांसाठी हजारो आदिवासी समाजबांधव आणि भगिनी सोमवारी (दि. ६) रस्त्यावर उतरल्या. येथील इंदिरा गांधी स्टेडियममध्ये सकाळपासून तुफान गर्दी करत या समाजाने दुपारी १:०० वाजतानंतर आरक्षण वाचविण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढला. आदिवासींच्या जमिनी गैरआदिवासींना भाडेतत्त्वावर देण्यासही या समाजाने तीव्र विरोध केला,आदिवासी समाजाच्या आरक्षणावर बंजारा आणि धनगर समाजाकडून हैदराबाद गॅझेटच्या आधारावर दावा केला जात आहे. या दोन्ही समाजांना स्वतंत्र आरक्षण असताना ते आदिवासी समाजात समाविष्ट होऊन आरक्षण मिळवण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप आदिवासी कृती समितीने केला आहे. बंजारा आणि धनगर समाज आदिवासींचे निकष पूर्ण करत नसून, त्यांना आदिवासी आरक्षणात समाविष्ट करणे भारतीय संविधानाच्या विरोधात आहे, असे समितीचे म्हणणे आहे.

### पोलिसांचा चोख बंदोबस्त

**मोर्चात समाजबांधवांनी तुफान गर्दी केल्याने जागोजागी वाहतुकीचा खोळंबाही झाला. मोर्चात अनूचित प्रकार घडू नये, म्हणून जागोजागी पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. दरम्यान शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राष्ट्रपतींना निवेदन पाठविले.**

आदिवासी समाज हा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि राजकीयदृष्ट्या मागासलेला आहे. बंजारा, धनगर व इतर गैरआदिवासी समाजाला आदिवासी आरक्षणात समाविष्ट केले, तर मूळ आदिवासी समाजाच्या हक्कांवर गदा येईल आणि त्यांची परिस्थिती आणखी बिकट होईल अशी भीती समितीने व्यक्त केली आहे. यातूनच संयुक्त आदिवासी कृती हक्क समिती व विविध आदिवासी संघटनांच्या नेतृत्त्वात हा मोर्चा काढण्यात आला. विविध सामाजिक संघटना आणि काही राजकीय पक्षांनी मोर्चाला जाहीर समर्थन दिले होते. येथील इंदिरा गांधी स्टेडियममध्ये सोमवारी सकाळपासून जिल्ह्यातील आदिवासी समाजबांधव आणि भगिनी एकत्र आले व दुपारी १:०० वाजतानंतर हजारोंच्या संख्येत असलेल्या समाजबांधवांनी आपला मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयाकडे वळिवला.



# गोंदिया आणि तिरोडा ओबीसींच्या कोट्यात



आता आरक्षणाचे चित्र स्पष्ट झाल्याने निवडणूक रणधुमाळीला आणखी रंग चढणार आहे.

ओबीसी आरक्षणाच्या तिढ्यामुळे गेल्या साडेतीन वर्षांपासून जिल्ह्यातील गोंदिया व तिरोडा नगर परिषदा आणि सालेकसा



### प्रभागांचेही चित्र होणार स्पष्ट

**गोंदिया आणि तिरोडा नगर परिषदेची अंतिम प्रभाग रचना ३० सप्टेंबरला जाहीर करण्यात आली. त्यात गोंदिया नगर परिषदेत आता २२ प्रभाग व ४४ सदस्य, तर तिरोडा नगर परिषदेत १० प्रभाग व २० सदस्य असणार आहेत. बुधवारी (दि. ८) प्रभागनिहाय आरक्षण जाहीर केले जाणार आहे. त्यानंतर कोणत्या प्रभागातून लढायचे, याबाबतचा इच्छुकांचा मार्ग मोकळा होणार आहे.**

### यांची नावे आहेत चर्चेत

**नगराध्यक्षपदाचे आरक्षण जाहीर झाल्यानंतर आता गोंदिया शहरातून नगराध्यक्षपदासाठी वेगवेगळ्या पक्षांतून निवडणूक लढण्यास इच्छुकांची नावे चर्चेत येऊ लागली आहेत.यामध्ये, भारतीय जनता पक्षाकडून माजी नगराध्यक्ष कशिश जायस्वाल, माजी नगरसेवक बंटी पंचबुद्धे व डॉ. प्रशांत कटरे यांची नावे आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून डॉ. माधुरी नासरे यांची तयारी सुरूच आहे. उद्धवसेनेकडून माजी उपाध्यक्ष पंकज यादव तर शिंदेसेनेकडून जिल्हाप्रमुख सोनू कुथे यांचेही नाव ऐकू येत आहे. विशेष म्हणजे, वेळेनुसार आता यात आणखी नावांची भर पडणार यात शंका नाही.**

### मोर्चेबांधणीला आता होणार सुरूवात

**नगर परिषद व नगर पंचायतीच्या निवडणुका होणार हे स्पष्ट होताच इच्छुकांकडून तयारीला सुरूवात झाली होती.येथे फक्त त्यांना आरक्षणाची प्रतीक्षा होती. आता आरक्षण स्पष्ट झाल्याने इच्छुकांकडून तयारीला आणखी जोर येणार, यात शंका नाही.अशात आता पक्षाकडून तिकीट मिळवण्यासाठी जोडतोड सुरू होणार आहे. विशेष म्हणजे, अनेकांनी गेल्या साडेतीन वर्षांपासून तयारी करून ठेवली आहे. आरक्षण जाहीर झाल्यानंतर आता इच्छुकांचा निवडणूक लढण्याचा मार्ग मोकळा झाला असून, निवडणुकीच्या रणसंग्रामाला आता खरी सुरुवात होणार आहे. त्याचबरोबर देवरी नगर पंचायत अनु, जाती, अर्जुनी-मोरगाव अनु, जमाती (महिला) तर सडक-अर्जुनीचे नगराध्यक्षपद सर्वसाधारण महिलासाठी आरक्षित करण्यात आले आहे.**

**गोंदिया :-** नगर परिषद व नगर पंचायत निवडणुकीचे वारे वाहू लागल्यापासून नगराध्यक्ष पदाच्या आरक्षणाकडे सर्वांच्या नजरा लागून होत्या. अशात सोमवारी (दि. ६) नगराध्यक्ष पदासाठीचे आरक्षण जाहीर करण्यात आले असून, यामध्ये गोंदिया व तिरोडा या दोन्ही नगर परिषदांमधील नगराध्यक्षपद नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी (ओबीसी) आरक्षित करण्यात आले आहे. तर निवडणूक होऊ घातलेल्या नगर पंचायतींमध्ये गोरेगावचे नगराध्यक्षपद अनु जमाती आणि सालेकसाचे नगराध्यक्षपद खुल्या प्रवर्गासाठी आरक्षित करण्यात आले आहे.

### गोंदियात आता २२ प्रभाग ४४ नगरसेवक


**गोंदिया नगर परिषदेच्या प्रभागरचनेत यंदा एक प्रभागात वाढ झाली आहे. पूर्वी २१ प्रभाग ४२ सदस्य होते. तर, आता २२ प्रभाग झाल्याने ४४ नगरसेवक असणार आहे. दोन नगरसेवकांची संख्या वाढणार असल्याने इच्छुकांमध्ये चूरस पाहायला मिळणार आहे. तर, तिरोडा नगर परिषदेत पूर्वी ७ प्रभाग १७ नगरसेवक होते, तर येथे ३ प्रभाग वाढल्याने नगरसेवकांची संख्या २० झाली आहे.**

व गोरेगाव नगर पंचायतींची निवडणूक लांबणीवर पडली आहे. परिणामी, या नगर परिषदा व नगर पंचायतींमध्ये प्रशासकराज सुरू असून, विकासकामांना मब्रेकफ लागला आहे.

सर्वोच्च न्यायालयाने ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावर तोडगा काढत जानेवारी २०२६ पूर्वी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे निर्देश शासनाला दिले. त्यानंतर निवडणूक विभाग व राज्य सरकार कामाला लागले आहे.

३० सप्टेंबर रोजी नगर परिषद आणि नगर पंचायतींची अंतिम प्रभाग रचना जाहीर करण्यात आली. त्यानंतर सर्वांचे लक्ष नगराध्यक्ष पदाचे आरक्षण केव्हा जाहीर होते, याकडे लागले होते. यानंतर शासनाने शुक्रवारी (दि. ३) नगराध्यक्ष पदाच्या आरक्षणाचा कार्यक्रम जाहीर केला. त्यानुसार सोमवारी (दि. ६) नगराध्यक्ष पदाचे आरक्षण जाहीर करण्यात आले. यामध्ये सर्वांच्या नजरा लागून असलेल्या जिल्ह्यातील गोंदिया व तिरोडा या दोन्ही नगर परिषदांमधील नगराध्यक्षपद नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी (ओबीसी) आरक्षित करण्यात आले आहे.

# नागपूरात १० ऑक्टोबरला ओबीसींचा आक्रोश महामोर्चा




**गोंदिया :-** राज्य सरकारने २ सप्टेंबर रोजी काढलेल्या शासन निर्णयामुळे ओबीसी आरक्षणाला धक्का बसणार आहे. हा शासन निर्णय रद्द करावा तसेच २०१४ पासून दिलेली कुणबी प्रमाणपत्र आणि जातपडताळणी प्रमाणपत्र याची श्वेतपत्रिका काढावी, या दोन मागण्या शनिवारी ओबीसी संघटनांनी मुख्यमंत्र्यांसमोर मांडल्या. सरकारने सकल ओबीसी संघटनांच्या या मागण्यांबाबत सकारात्मक प्रतिसाद न दिल्याने १० ऑक्टोबर रोजी नागपुरात महामोर्चा होणारच, अशी भूमिका सकल ओबीसी समाज तसेच ओबीसी संघर्ष कृती समितीच्या वतीने घेण्यात आली आहे. याबाबत (ता.६) पत्र परिषद घेवून ओबीसी बांधवांनी महामोर्च्यात सहभागी व्हावे, असे आवाहन कृती समितीचे जिल्हाध्यक्ष बबलु कटरे यांनी केले.

सकल ओबीसी महामोर्चा प्रतिनिधींची मुख्यमंत्री यांची भेट घेतली. दरम्यान झालेल्या बैठकीत विविध राज्यातील विविध ओबीसी संघटनांच्या प्रतिनिधींनी आपली भूमिका मांडली. २ सप्टेंबर रोजी काढलेल्या जीआरने ओबीसी समाजाच्या हक्काचे आरक्षणाला धक्का लागणार आहे.

२ सप्टेंबर रोजी सरकारने काढलेल्या शासन निर्णयानंतर राज्यात १२ ओबीसी तरुणांनी आत्महत्या केल्याची माहिती तसेच शासन निर्णयातील चुक एड मंगेश ससाणे यांनी मुख्यमंत्र्याच्या समोर ठेवली. काही ठिकाणी दोन समाजात हिंसाचाराच्या घटना घडल्या आहेत. गावपातळीवर अनेक ठिकाणी खाडाखोड करून प्रमाणपत्र तयार केली जात आहेत, मराठवाड्यात दोन समाजात वितुष्ट निर्माण झाले आहे, एकमेकांच्या लग्नाला जाणं टाळत आहेत, शाळांमधून विद्यार्थ्यांना काढायला सुरुवात झाली आहे. ज्या गतीने जात प्रमाणपत्र वाटली जात आहेत, त्यातून येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ओबीसी समाजाला प्रतिनिधित्व राहणार नाही, असा धोक्याचा इशारा बैठकीत दिला.

दरम्यान राज्य शासनाने ओबीसी संघटनांकडून ठेवण्यात आलेल्या तीन महत्वपूर्ण मागण्या मान्य न केल्याने चर्चा फिस्कटली. यामुळे सकल ओबीसी समाज आपल्या मागण्यांना घेवून ठाम भुमिका जाहिर केली आहे. यानुसार आयोजित १० ऑक्टोबर महामोर्चा होणारच, अशी भूमिका सकल ओबीसी समाज तसेच ओबीसी संघर्ष कृती समितीच्या वतीने घेण्यात आली आहे.

याबाबत (ता.६) पत्र परिषद घेवून ओबीसी बांधवांनी महामोर्च्यात सहभागी व्हावे, असे आवाहन कृती समितीचे जिल्हाध्यक्ष बबलु कटरे यांनी केले. यावेळी अमर वऱ्हाडे, बंटी पंचबुध्दे, धनलाल ठाकरे, सुनील पटले, मनोज मेंढे, विनोद हरीणखेडे, ऋषीकांत शाहू, डॉ.राजकुमार यादव, क्रिष्णा कठाणे, जितेंद्र कटरे, जीवन शरणागत, दुर्गा ठाकरे, महेंद्र बिसेन आदिसह ओबीसी संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

### जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त विविध रोगनिदान व उपचार शिबीर

गोंदिया : जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त शासकीय वैद्यकाय महाविद्यालय व रुग्णालय अधिष्ठाता डॉ. कुसुमाकर घोरपडे यांच्या नेतृत्वात रोग निदान व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले.आयोजित रोग निदान व उपचार शिबिराच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष सहाय्यक आयुक्त समाज कल्याण विभाग किशोर भोयर तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. कुसुमाकर घोरपडे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. पुरुषोत्तम पटले, वैद्यकीय अधीक्षक डॉ. दिगंबर मरसकोल्हे, ज्येष्ठ नागरिक सेवा संघाचे अध्यक्ष नारायण प्रसाद जमाईवार, दुलीचंदजी बुंदे, लखनसिंह कटरे आणि ज्येष्ठ नागरिक संघटनेचे सर्व पदाधिकारी महिला व पुरुष कार्यक्रमाला उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविकात अधिष्ठाता डॉ. कुसुमाकर घोरपडे यांनी शासन सेवेत ज्येष्ठ नागरिकांना आरोग्य विषयी ज्या सेवा व सुविधा विनाशुल्क दिल्या जातात त्याची माहिती. तसेच ज्येष्ठ नागरिकाच्या सेवेकरिता विशेष करून ज्येष्ठांच्या आरोग्याची काळजी घेता येईल त्याकरिता आठवड्यातील गुरुवार आणि शुक्रवार वेळ तीन ते चार या वेळे विविध तज्ञ आपल्या सेवेंकरता उपस्थित राहतील असे डॉ घोरपडे यांनी सांगितले.

वैद्यकीय अधीक्षक डॉ. दिगंबर मरसकोल्हे यांनी महात्मा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि आयुष्मान भारत व आभार याबद्दलची आरोग्य सेवेत तसा लाभ घेता येतो सविस्तरपणे माहिती देण्यात आली. १३५६ आजारावर विनाशुल्क लाभ घेता येते अशी त्यांनी सांगितले.

जिल्हा शल्य चिकित्सक डॉ पुरुषोत्तम पटले यांनी जेष्ठ नागरिक आणि उपस्थित मान्यवरांना त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासंदर्भात थोडक्यात माहिती दिली.

# ३१ हजार ६२८ कोटींचं पॅकेज जाहीर

**मुंबई**-राज्यात अलीकडील अतिवृष्टी-महापूरामुळे कोट्यवधींचे नुकसान झाल्यानंतर मंगळवार (७ ऑक्टोबर) रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीनंतर सरकारने शेतकऱ्यांसाठी ३१,६२८ कोटींचे विशेष पॅकेज जाहीर केले. पूरग्रस्त भागांना तातडीची मदत, शेती-पशुधन पुनर्प्रस्थापना आणि पायाभूत सुविधांच्या दुरुस्तीसाठी



निधी उपलब्ध करून देण्यात येणार असून, या निर्णयाने बळीराजाला मोठा दिलासा मिळाला आहे.

पत्रकार परिषदेत सांगण्यात आले की, सर्वाधिक फटका बसलेल्या २९ जिल्ह्यांवर प्राधान्याने मदत पोहोचवली जाणार आहे. शेतकरी आपले पीक पोटच्या लेकरासारखे जपत असतो. पावसाने उद्ध्वस्त झालेले आयुष्य पुन्हा उभे करण्यासाठीच हे पॅकेज, असे सरकारकडून स्पष्ट करण्यात आले. घरं, जनावरे, शेतजमीन आणि सिंचनस्रोतांच्या नुकसानीसाठी स्वतंत्र तरतुदी करण्यात आल्या आहेत.

डोंगरी भागातील कोसळलेल्या घरांसाठी १०,००० पर्यंत तातडीची मदत देण्यात येणार आहे. दुधाळ जनावरांच्या नुकसानीसाठी ३७,००० पर्यंत भरपाई तर खरडून गेलेल्या जमिनींसाठी ४२,००० प्रति हेक्टरी सहाय्य जाहीर झाले आहे. त्याशिवाय प्रति विहीर ३०,००० मदत आणि ग्रामीण भागातील बाधित रस्ते, पूल, वीजपुरवठा आदींसाठी १,५०० कोटींचा स्वतंत्र निधी राखीव ठेवण्यात आला आहे.

शेतीत पुन्हा लागवडीसाठी रब्बी हंगामात बियाण्यांचे अतिरिक्त सहाय्य सुमारे ६,१७५ प्रति हेक्टरी देण्याचा उल्लेख करण्यात आला असून कोरडवाहू शेतकऱ्यांसाठी ३५,००० आणि बागायती शेतकऱ्यांसाठी ५०,००० पर्यंत मदतीची तरतूद आहे. पीकविमा घेतलेल्या सुमारे ४५ लाख शेतकऱ्यांपर्यंत भरपाईचे वितरण वेगाने करण्याचा आराखडा तयार करण्यात आला असून, तपशील संबंधित शासन निर्णय/परिपत्रकात स्पष्ट केले जातील.

जिल्हा प्रशासन, तालुका पातळीवरील आपत्ती व्यवस्थापन पथके आणि महसूल-पंचनामा अहवालांच्या आधारे पात्र लाभार्थी निश्चित केले जातील. ग्रामसेवक आणि तलाठींच्या पडताळणीनंतर शेतकऱ्यांची बँक-सीडिंग माहिती अद्ययावत करून मदत थेट खात्यात जमा करण्यावर भर दिला जाणार आहे, जेणेकरून मध्यस्थाविना पारदर्शक वाटप होईल.

पूरामुळे सुपीक वरची माती वाहून जाणे, सिंचन संरचना व रस्त्यांचे नुकसान अशा समस्या मोठ्या प्रमाणात समोर आल्या आहेत. त्यामुळे जमिनीची पुनर्तयारी, मल्चिंग/मृदा-संधारण, तसेच स्थानिक पातळीवरील जलनिस्सारण सुधारणा यांना प्राधान्य देत पॅकेजची अंमलबजावणी केली जाणार आहे. सरकारने बनावट दावे रोखण्यासाठी कडक पडताळणी आणि जबाबदारी निश्चितीचा यंत्रणा-आराखडा लागू करण्याचेही संकेत दिले आहेत.

# जिल्हास्तरीय युवा महोत्सव आयोजन

**गोंदिया :** कीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत जिल्हा कीडा अधिकारी कार्यालय व जिल्हास्तर युवा महोत्सव योजन समिती यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय युवा महोत्सव दिनांक ३० ते ३१ ऑक्टोंबर २०२५ या कालावधीत बुध्दिष्ट समाज संघ संथागार जिल्हा क्रीडा संकुल जवळ गोंदिया येथे आयोजित करण्यात येणार आहे.

यामहोत्सवा अंतर्गत युवकांचा संर्वांगीन विकास करणे, संस्कृती व परंपरा जतन करणे, युवकांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना वाव देणे व राष्ट्रीय एकात्मता वाढीस लावणे तसेच विज्ञान व तंत्रज्ञान यावर आधारीत नवसंकल्पनावर विविध उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. जिल्हयातील संगीत महाविद्यालय, वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालय, १५ ते २९ वयोगटातील युवक व युवती यांना सहभाग घेता येईल. प्राविण्यधारकांस रोख पारितोषिक शासनाकडून अनुदान प्राप्त होताच देण्यात येईल.

# आधार व स्वयंम योजनेतंर्गत प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक जाहीर

**गोंदिया** :इतर मागास प्रवर्गातील मुलां/मुलींसाठी शासकीय वसतीगृहामध्ये प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरू झालेली आहे. त्यानुसार इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत कार्यरत असलेल्या मुलां-मुलींच्या वसतीगृहामध्ये तसेच आधार व स्वयंम योजनेतंर्गत १२ वी नंतर उच्च शिक्षण घेणश्रया विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येणार आहे.

ऑनलाईन पोर्टलवर शासकीय वसतीगृह असलेल्या जिल्हयासाठी वसतीगृह, पंडित दिनदयाल स्वयंम व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना यासाठी १२ वी नंतरच्या व्यवसायीक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या पदवी आणि पदव्युतर अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी बिगर व्यावसायिक अभ्यासक्रम व व्यवसायिकअर्ज भरून ऑनलाईन भरलेला अर्जाची प्रिंट व आवश्यक कागदपत्रे सादर करावी. शासकीय वसतीगृहासाठी पात्र असलेल्या तथापि गुणवत्तेनुसार व वसतीगृहाच्या क्षमतेअभावी वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज पंडित दिनदयाल स्वयंम व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेसाठी विचारात घेतले जातील.

शासनाच्याऑनलाईन पोर्टलवर दिनांक ३०/०९/२०२५ ते २६/१०/२०२५ पर्यंत अर्ज भरून ऑनलाईन भरलेला अर्जाची प्रिंट व आवश्यक कागदपत्रे संबंधीत वसतिगृहास विहीत मुदतीत सादर करावी. अधिक माहितीकरीता इमाव, विमाप्र व विजाभज मुलां-मुलींचे शासकीय वसतीगृह गोंदिया, येथील गृहपाल (अश्विनी दीघोरे गृहपाल मो. नं. ९७६५०८४०९० आणि मंगलेश गिरी गृहपाल मो.नं.८७८८२३५७६७) तसेच सहाय्यक संचालक कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, गोंदिया, यांनी केले आहे.

# नगराध्यक्षपद सोडतीने अनेकांच्या इच्छेवर पाणी फेरले

**गोरेगाव :-** मुंबई येथे निघालेल्या आरक्षण सोडती दरम्यान गोरेगाव नगरपंचायत आरक्षण सोडतमध्ये अनुसूचित जमाती सर्वसाधारण या प्रवर्गासाठी नगराध्यक्षपदासाठी आरक्षण सोडत काढण्यात आली. या सोडतीमुळे अनेकांचे धाबे दणाणले तर बाशिंग बांधून असलेल्यांचे स्वप्न भंग झाले.





मुंबई येथे नगरपंचायतच्या नगराध्यक्षपदासाठी आरक्षण सोडत काढण्यात आली. या आरक्षणाकडे राजकीय नेत्यांसह इच्छुकांचे लक्ष लागले होते. त्यातच गोरेगाव नगरपंचायत एकाचवेळी सुरू झाल्यानंतर मुंबई येथे नगराध्यक्ष पदाची आरक्षण सोडत काढण्यात आली.

गोरेगाव नगरपंचायतची ही दुसरी निवडणूक ठरणार आहे. तत्पूर्वी २०१५ मध्ये पहिली निवडणूक घेण्यात आली होती तेव्हा सर्वसाधारण महिला आरक्षण पाहायला मिळत आहे. त्यातच प्रशासकीय घडामोडींना वेग आला आहे. निवडणुका ताकदीने लढण्यासाठी महायुती आणि महाविकास आघाडीतील घटक पक्षाने मोर्चेबांधणीला सुरुवात केली आहे. आगामी नगरपंचायत निवडणुकांसाठी इच्छुक नेत्यांमध्ये आता धाकधूक वाढली आहे तर अनेक पक्षांचे कार्यकर्तेही आता कामाला लागल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

गोरेगाव नगरपंचायतीसाठी अनु. जमाती या प्रवर्गातून आरक्षण सोडत निघाल्याने शहरातील दिग्गज नेत्यांना मोठा फटका बसल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. या निवडणुकीत माजी नगराध्यक्ष आशिष बारेवार, माजी नगरसेवक सुरेंद्र पटले, माजी नगरसेवक डॉ. रूस्तम येडे, माजी जि. प. सदस्य तथा काँग्रेसचे तालुकाध्यक्ष जगदीश येरोला, नगरपंचायतीचे माजी उपाध्यक्ष सुरेश रहांगडाले, माजी सभापती मलेश्याम येरोला हे नगराध्यक्षपदासाठी प्रबळ दावेदार मानले जात होते. मात्र, अनु. जमाती प्रवर्गाची आरक्षण सोडत निघाल्याने आता नव्या उमेदवाराची शोधमोहीम सुरू झाली आहे. काँग्रेस पक्षाच्या वैशाली कोठेवार काँग्रेसकडून प्रबळ दावेदार मानल्या जात आहेत. तर भाजपकडून अनेक चेहरे बाशिंग बांधून आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट हे सुद्धा आपले उमेदवार मैदानात उतरविणार त्यामुळे राजकारणात त्रिकोणी संघर्ष पाहायला मिळणार आहे.

# गौतम अदाणी यांनी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाची पाहणी केली

**नवी मुंबई:-** आंतरराष्ट्रीय विमानतळ (NMIA) आपल्या औपचारिक उद्घाटनाच्या आधी अंतिम टप्प्यात पोहोचला आहे.बुधवार, ८ ऑक्टोबर २०२५ रोजी होणाऱ्या उद्घाटनापूर्वी अदाणी समूहाचे चेअरमन गौतम अदाणी यांनी विमानतळाला भेट देऊन तयारीची पाहणी केली.



गौतम अदाणी यांनी विमानतळाच्या तांत्रिक प्रगती आणि संचालनाची सखोल तपासणी केली. पूर्ण क्षमतेने कार्यरत झाल्यानंतर हा विमानतळ दरवर्षी ९ कोटी प्रवाशांची सोय करू शकेल, ज्यामुळे तो जगातील सर्वात मोठ्या आणि अत्याधुनिक विमानतळांमध्ये गणला जाईल.

या प्रसंगी गौतम अदाणी यांनी विमानतळ घडवणाऱ्या विविध गटांशी संवाद साधला. त्यांनी बांधकाम कामगार, अभियंते, प्रकल्प टीम, अग्निशमन दलाचे कर्मचारी आणि टर्मिनलमधील रिटेल आउटलेटमध्ये काम करणाऱ्या दिव्यांग कर्मचाऱ्यांशी देखील भेट घेतली.

या वेळी गौतम अदाणी म्हणाले -"येथील प्रत्येक धावपट्टी, प्रत्येक टर्मिनल आणि प्रत्येक गेट हजारो हात आणि हृदयांशी जोडलेले आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हा फक्त एक इन्फ्रास्ट्रक्चर प्रकल्प नाही, तर भारताच्या भावनेचे आणि सामूहिक प्रयत्नांचे प्रतीक आहे - भारताच्या लोकांनी, भारताच्या लोकांसाठी घडवलेला."

पंतप्रधानांच्या हस्ते ८ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या उद्घाटनापूर्वीच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ मुंबईतील हवाई वाहतुकीवरील गर्दी कमी करण्यासाठी, प्रादेशिक आणि राष्ट्रीय आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी आणि भारताच्या भविष्याचे प्रवेशद्वार ठरण्यासाठी पूर्णतः सज्ज झाला आहे.

## संपादकीय

# वन्यप्राणी शेतात अनं रस्त्यांवर...!

एकीकडे राज्यात कोसळलेल्या पावसाने शेतीच काय होणार असा प्रश्न घेऊन चिंताक्रांत असलेल्या शेतकऱ्याला अनेक समस्या आणि प्रश्नांना सामोरे जावे लागत आहे. निसर्गाच चक्र विचित्र पद्धतीने सतत बदलत आहे. त्या बदलणाऱ्या ऋतुचक्राची उपाययोजना कुणाच्याच हातात नाही. या बदलाला सामोरे जाण्याचा प्रयत्न कोकणातील सर्वसामान्यजन करत आहे. या अचानक येणाऱ्या संकटाला आणि उद्भवणाऱ्या प्रसंगांना सामोरे जाण्याचा प्रयत्न होत आहे.

विदर्भातील गडचिरोली,गोंदिया,चंद्रपूर,भंडारासह कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात वन्यप्राण्यांचा लोकवस्तीतील वावर फार मोठ्या प्रमाणावर वाढला आहे.विदर्भ हा जंगलव्याप्त भाग असला आणि कोकणात जरी फलोद्यान लागवड योजनेतून आंबा, काजू यांच्या बागायतीचे क्षेत्र वाढले असले तरीही कोकणात बेसुमार जंगलतोडीचं प्रमाणही फार मोठ्याप्रमाणात होत आहे. शासनाच्या वनविभागाच्या आशीर्वादानेच ही जुनी जंगल वनसंपत्ती नष्ट करण्याचे प्रमाणही वाढले आहे.

बेसुमार जंगलतोड होत असताना जंगलांमध्ये सर्वत्रच रानमोडी इतक्या मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. या रानमोडीने जंगलातील वन्यप्राण्यांना उपयुक्त असणारी झाडांची वाढही खुंटली आहे. विशेष म्हणजे खासगी क्षेत्रातील झाडांची तोड होत असतानाच शासकीय जंगलातील झाडही तोडण्यात येतात. मोठ–मोठी सागवानसारख्या किमती झाडांची होणाऱ्या तोडमुळे कोकणातील जंगलामध्ये झाडकमी आणि रानमोडी अधिक जंगलांना रानमोडीनेच वेढा घातला आहे असे म्हटले तरी वावगे ठरू नये अशी स्थिती आहे.

रानमोडी मोठ्या प्रमाणात जंगलातून पसरल्याने जंगलातील अनेक औषधी वनस्पतीही नष्ट झाल्या आहेत. कोकणात पूर्वी सह्याद्री पट्ट्यात अनेक गुणकारी औषधी वनस्पती होत्या; परंतु रानमोडीच्या वाढीने या औषधी वनस्पती कुठे दिसेनाशा झाल्या आहेत. रानमोडी एवढ्या मोठ्या प्रमाणात जंगलात पसरत असताना आजच्या घडीला या रानमोडीची वाढ रोखण्यासाठी शासनाच्या वनविभागाकडून आजवर कोणतेही प्रयत्न देखील झालेले नाही. शासनाच्या वनविभागाला जंगलातील रानमोडी रोखण्यासाठी खास उपाययोजना कराव्या लागतील तरच जंगल वाचवता येईल. जंगलातील रानमोडी वाढल्याने जंगलातील वन्यप्राणी मानवी वस्तीमध्ये येत आहे.

विदर्भात तर हत्तींनी धुमाकुळ घातला असून शेतातील पिके नुकसान करु लागली आहेत.गावात येत घरांचेही नुकसान सुरु केले आहे.त्याचप्रमाणे व्याघ्रप्रकल्पाशेजारील वाघ व बिबट्यांचा वावर गावालगत सुरु होऊन अनेकांना आपला जिव सुध्दा गमवावा लागला आहे.तीच परिस्थिती कोकणात अनेक भागात वाघ दिवसाढवळ्या रस्त्यांवर दिसत आहे. काही गावातील घराशेजारी वाघांची डरकाळी ऐकू येऊ लागली आहे. रहदारीच्या मार्गांवर जो वाघ पूर्वी कधीतरी घनदाट जंगलात दिसायचा तो वाघ गावातून, शहरातील कॉलनीत फिरताना दिसतो.हत्तींचा वावर कोकणातील गोवा राज्याच्या व कर्नाटक राज्याच्या सीमावर्ती भागात फिरतात.

ज्या भागात हत्ती फिरतात त्या भागातील शेती बागायती नष्ट झालेली असते. अनेक गावच्या शेतकऱ्यांनी वन्यप्राण्यांच्या या मानवी वस्तीतील येण्याने शेतीच सोडून दिलेली. कोकणात अनेक उदाहरणे आहेत. माकडांनी तर थेट घरातच प्रवेश घेतला आहे. शेतात काम करणाऱ्या शेतकऱ्यांनी शेती, बागायतीत जाण्यापूर्वी जर घरात जेवण बनवून ठेवलेले असेल तर माकड कळपानी घरात येतात आणि घरात बनवून ठेवलेले अन्नपदार्थ उलटे करताता. किंवा त्याचा विध्वंस करतात. माकडांच्या घरात येण्याला जसा शेतकरी कंटाळला आहे.

वनविभागाकडे यासंबंधी शेतकऱ्यांनी तक्रार केल्यावरही वनविभागाचे अधिकारी फक्त हतबलता व्यक्त करतात. शासनाकडून मिळणाऱ्या नुकसानभरपाईने खरे तर कधीच नुकसान भरून येत नाही. त्यामुळे विदर्भ व कोकणातील शेतकरी खरे तर या वन्यप्राण्यांच्या रोजच्या त्रासाला फारच कंटाळला आहे; परंतु "रोज मरे त्याला कोण रडे' याप्रमाणे शेतकऱ्यांच्या या व्यथेला कोणतेच उत्तर नाही. शासनाकडून केल्या जाणाऱ्या उपाययोजना मर्यादा आहेत. त्या पलीकडे जाऊन कोणालाच काही करता येत नाही. अशी स्थिती आहे.

जंगलांमध्ये जंगलात रहाणाऱ्या पशु–पक्ष्यांना खाण्यासारख काही उरल नाही. केवळ यासाठीच आज पूर्वी जंगलामध्ये असणारे हे प्राणी केवळ दूरवरच्या आवाजाने त्या भागातील जंगलात आवाजावरून तो प्राणी पक्षी आहे हा अंदाज वर्तविला जायचा; परंतु गेल्याकाही वर्षातील बेसुमार जंगलतोडीने कोकणचा सृष्टी सौंदर्याने नटलेला खरा आकर्षक चेहराच विद्रुप करण्यात आला आहे. होणारी जंगलतोड वनविभागाच्या अधिकाऱ्यांच्या मूक सहमतीनेच होत असल्याने कुंपनच चोर असणाऱ्या रखवालदाराने उद्धवस्त करण्याचा प्रयत्न होत आहे.

आज रस्त्यांवर दिसणारे हे वन्यप्राणी मानवी वस्तीतील घरापर्यंत पोहोचलेच आहे. भविष्यात वाडी–वस्तीत फिरणेही सामान्य शेतकऱ्यांना मुश्किल होईल याची जाणीव आणि भान राखणे आवश्यक आहे; परंतु आपल्याच मस्तीत वावरणाऱ्या आपणाला मानवी वस्तीत येऊन वन्यप्राणी शेतकऱ्यांना जाणीव करून सातत्याने देत आहेत. सुधारणा करायची की नाही हे आपणच ठरवायचे आहे. आज हमरस्त्यांवर दिसणारे हे प्राणी गल्ली–बोळातही उभे असलेले दिसतील. दोष त्या वन्यप्राण्यांचा नाही तर दोष आपला आहे. त्यांच्या वस्तीत आपणच अतिक्रमण केलय. तर ते आपल्या वस्तीत आले तर गैर काय? नाही का...?

# सालेकसा नगरपंचायतीचे नगराध्यक्ष पद खुल्या प्रवर्गाकरिता

**सालेकसा:–** सोडत जाहीर झाली असून, सालेकसा नगरपंचायतमध्ये नगराध्यक्षपद खुला करण्यात आला आहे. त्यामुळे याआधी घोषित झालेले महिला खुला प्रवर्गातील राखीव असलेल्या नगराध्यक्ष पदावर आता पुरुष किंवा स्त्री कोणीही आणि कोणत्याही जातीचा व्यक्ती विराजमान होऊ शकतो. त्यामुळे भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी व शिव–सेना यांच्यासह इतर पक्ष आपला डाव महिलेवर खेळतात की पुरुषांना संधी देतात याची वाट बघावी लागेल.

सन २०१५ मध्ये पहिल्यांदा सालेकसा नगरपंचायतचे नगराध्यक्ष महिला ओबीसीसाठी राखीव ठेवण्यात आले होते. परंतु त्यावेळेस नगरपंचायतची निवडणूक झाली नव्हती. सन २०१७ मध्ये नगराध्यक्ष पद अनुसूचित जमातीसाठी राखीव करण्यात आले होते व तेव्हा




भाजपचे वीरेंद्र उईके नगराध्यक्ष झाले. त्यानंतर नगराध्यक्षपद खुल्या प्रवर्गातील महिलेसाठी राखीव करण्यात आले होते. त्यानुसार भाजप आणि काँग्रेस दोन्ही पक्षांनी आपले उमेदवार जवळपास निश्चित केले होते. परंतु आता चौथ्यांदा नगराध्यक्षपदाचे आरक्षण जाहीर झाले असून, येथील नगराध्यक्ष खुले करण्यात आले आहे. त्यामुळे महिलेसोबतच पुरुषांनाही निवडणूक लढण्याची संधी मिळणार आहे. अशात आता दिग्गज उमेदवार मैदानात उतरू शकतात. दोन वर्षांपूर्वी काँग्रेसने लता फुंडे यांना तर भाजपने शालिनी बडोले यांना आश्वासन नगराध्यक्ष पद खुल्या प्रवर्गासाठी जाहीर झाले असले तरी नगराध्यक्ष पदासाठी उमेदवार पक्षाच्या बैठकीत ठरवला जाईल. महिला उमेदवार देण्यासाठी विकल्प खुला असून, कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन पक्षाच्या समर्पित कार्यकर्त्यालाच संधी दिली जाईल. देवराम चुटे, भाजप तालुकाध्यक्ष, दिले होते. अशात काँग्रेस आणि भाजपसह इतर पक्ष महिलांवर डाव खेळणार ही पुरुषांना संधी देणार हे बघावे लागेल.

# रोजगार हाच एकल महिलांचा जीवनाधार-राज्य निमंत्रक हेरंब कुलकर्णी

**सडक अर्जुनी:–** राज्यात एकल, विधवा, महिलांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. कमावता पुरुष गेल्याने कुटुंबाचे पालनपोषण करण्याची जबाबदारी एकल महिला यांना पेलवणे अवघड आहे. या परिस्थितीत गोंदिया जिल्ह्यातील एकल महिलांचे सर्वेक्षण होणे गरजेचे आहे. त्यातून महिलांच्या रोजगारासाठी तरतूद करण्यात आली, तर महिलांना उत्पादनाचे साधन प्राप्त होईल. त्यांची आर्थिक घडी सुधारेल. रोजगार हाच एकल महिलांचा जिवनाधार आहे, असे मत एकल महिला समितीचे राज्य निमंत्रक हेरंब कुलकर्णी यांनी व्यक्त केले.सडक अर्जुनी येथे संबोधी बुद्ध विहारात तालुक्यातील एकल



महिला व कार्यकर्ते यांची भेट घेतली, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी गोंदिया जिल्हा समन्वयक अनिल मेश्राम, सेवानिवृत्त नायब तहसीलदार भाऊराव यावलकर, माजी सैनिक तथा ग्राम महसूल अधिकारी भगवान नंदागवळी, महेंद्र चंद्रिकापूरे, रजनिश मेश्राम, प्रभाकर भेंडारकर, जागेश्वर वैद्य, चंद्रकांता मेश्राम, विवेकानंद ऐरावत, रोहित खोब्रागडे तसेच एकल महिला गायत्री बडोले, सीमा ब्राह्मणकर, किरण खरवडे, सुनीता कोरे, कविता बेंदवार, रूपा नंदागवळी, माया ठाकरे, विमल पाकमोडे, पुष्पा भांडारकर, राजश्री गहाणे, शोभा रामटेके आदी मान्यवर उपस्थित होते.

हेरंब कुलकर्णी यांनी एकल महिलांना मिळणाऱ्या विविध शासकीय योजनांची माहिती दिली. राज्यात सुमारे ८० लाख एकल महिला असून, त्यांच्यासाठी विविध योजना जसे बालसंगोपन, संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ, घरकूल, राशन कार्ड, अंत्योदय व रोजगार उपलब्ध कसे होईल, याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

सडक अर्जुनी तालुक्यातील एकल महिलांना मिळालेल्या विविध शासकीय योजनांचा आढावा घेतला. तसेच गोंदिया जिल्ह्यातील एकूण एकल महिला यांचे सर्वेक्षण करण्याची सूचना त्यांनी यावेळी केली. प्रास्ताविक व संचालन अनिल मेश्राम यांनी केले. तर आभार भाऊराव यावलकर यांनी मानले.

# शिक्षक सहकार संघटनेचा १२ ऑक्टोबरला होणार जिल्हा मेळावा

**गोंदिया:–**शिक्षक, विद्यार्थी व शाळा यांच्यासाठी काम करणार्या शिक्षक सहकार संघटनेचे अधिवेशन येत्या १२ ऑक्टोंबरला लकी लॉन गोंदिया येथे सकाळी १० वाजता आयोजित करण्यात आले आहे.

अधिवेशनाला राज्याचे शिक्षण राज्य मंत्री पंकज भोयर, माजी राज्यमंत्री परिणय फुके, आमदार विनोद अग्रवाल, आमदारराजकुमार बडोले, जिल्हा परिषद गोंदिया अध्यक्ष लायकराम भेंडारकर, संघटनेचे राज्य अध्यक्ष संतोषजी पीठ्ठुलवाड, शुभांगी चौधरी, आमदार विजय रहागडाले, आमदार संजय पुराम, आमदार सुधाकर आडबले,आमदार अभिजीत वंजारी, शिक्षण सभापती सुरेश हर्षे, मुख्य कार्यकारी अधिकारी एम मृगनाथाम, सभापती डॉ लक्ष्मण भगत, सभापती रजनीताई कुंभरे, सभापती पौर्णिमाताई ढेंगे, सभापती दीपाताई चंद्रिकापुरे, शिक्षणाधिकारी सुधीर महामुनी, प्राचार्य डायट राजकुमार हिवारे, शिक्षणाधिकारी विशाल डोंगरे, मुख्याधिकारी नप गोंदिया संदीप बोरकर,गटशिक्षणाधिकारी महेंद्र मोटघरे सुभाष बागडे,सुखचंद वाघमारे,लक्ष्मण चव्हाण एमडी पारधी मुनेश्वर मेश्राम व इतर पाहुणे उपस्थित राहणार असल्याची माहिती रवी अंबुले यांनी दिली.

# प्रत्येकाने देशसेवेसाठी कार्य करावे-जिल्हाधिकारी प्रजित नायर

**गोंदिया :–** देशासाठी आपली स्वत:ची काय जबाबदारी आहे हे आपण ओळखले पाहिजे. देशसेवेसाठी ज्या सैनिकांनी बलिदान दिले ते वाया जाणार नाही. भारतीय सैन्?य दल कुठेही मागे नाही. आपले सैनिक सीमेवर देशाची सुरक्षा करतात, त्यामुळेच आपण सुरक्षीत आहोत. त्यामुळे प्रत्येकाने देशसेवेसाठी कार्य करावे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृह येथे २९ सप्टेंबर रोजी आयोजित शौर्य दिन कार्यक्रमात ते अध्यक्षस्थानावरुन बोलत होते. अप्पर जिल्हाधिकारी मिनाज मुल्ला, निवासी उपजिल्हाधिकारी भैय्यासाहेब बेहेरे, उपजिल्हाधिकारी (सामान्य) तथा प्रभारी जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मानसी पाटील, उपविभागीय अधिकारी चंद्रभान खंडाईत यांची यावेळी प्रामुख्याने उपस्थिती होती.जिल्हाधिकारी श्री. नायर म्हणाले, आपले सैनिक हे कोणत्याही अडचणींची पर्वा न करता आपली कर्तव्ये चोखपणे बजावतात. परकीय शक्तींपासून देशवासीयांचे रक्षण करण्यासाठी आपला सैनिक सदैव तत्पर असतो. त्यामुळेच आपण सर्वजन सुरक्षीत आहोत. सैनिकांच्या वर्दीमध्ये ताकद असते. सैनिकांमध्ये शिस्तबध्दता असते. देशासाठी आपले कर्तव्य म्हणून आपण आपले योगदान दिले पाहिजे असे त्यांनी सांगितले.

प्रभारी जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी श्रीमती पाटील म्हणाल्या, वीरपत्नी, वीरमाता, माजी सैनिक व माजी सैनिकांचे अवलंबितांनी कौशल्य विकास प्रशिक्षण जास्तीत जास्त संख्येने करावे. माजी सैनिक/ विधवा यांच्याकरीता लिगल मेडिकल क्लिनिक उघडण्यात आले आहे, तरी सर्वांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले. जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाचे कल्याण संघटक धनराज बावनथडे यांनी सैनिकांना पारिवारिक पेन्शन तसेच विविध प्रकारच्या सुविधाबद्दल विस्तृत माहिती दिली.

माजी सैनिक बहुउद्देशीय संस्था तिरोडा यांनी पंजाब राज्यातील भीषण पूरस्थितीने बाधित नागरिकांना आर्थिक मदत म्हणून तहसिल स्तरावर सार्वजनिक रॅली काढून ७० हजार ६८० रुपये रक्कम गोळा करुन जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय



गोंदियाच्या मार्फत पंजाब प्रशासनास पोच केले.

या उत्कृष्ट कार्याकरीता जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी संस्थेस प्रशस्तीपत्र प्रदान करुन गौरवीत केले.कार्यक्रमास जिल्ह्यातील वीरपत्नी, वीरमाता, माजी सैनिक, माजी सैनिकांचे अवलंबित, मनोहरभाई पटेल मिलिट्री स्कुल गोंदिया येथील विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन माजी सैनिक गणेश बिसेन यांनी केले, तर उपस्थितांचे आभार प्रभारी जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मानसी पाटील यांनी मानले.

# संविधान गौरव स्पर्धा परीक्षेचे आयोजन



**गोंदिया :–** 'हर घर संविधान अभियान' अंतर्गत समाजकल्याण विभाग गोंदिया, संविधान मैत्री संघ गोंदिया व शाळा प्रशासन यांचे संयुक्त विद्यमाने संविधान गौरव स्पर्धा परिक्षा २०२५ चे आयोजन (ता. ५) करण्यात आले होते. यामध्ये जिल्ह्यातील आठही तालुक्यातील एकूण १२५ परिक्षा केंद्रांच्या माध्यामातून जवळपास १० हजार परिक्षार्थी प्रविष्ट झाले होते.

दरवर्षीप्रमाणे यंदाही संविधान गौरव स्पर्धा परीक्षा २०२५ चे आयोजन करण्यात आले. या परिक्षेत जिल्हाभरातून १० हजारावर विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. संविधानाची गौरवशाली ७५ वर्षे पुर्ण झाल्यानिमित्त ६० पर्यायवाची प्रश्न व १५ वर्णनात्मक असे १०० गुणाचे ७५ प्रश्न संविधान सभा, संविधान निर्मिती, मूलभूत हक्क, मूलभूत कर्तव्य, बालकांचे महिलांचे घटनात्मक हक्क, भारतातील संत महामानव परम्परा व संविधान संस्कृतीचे साम्य आदि विषयावर विचारण्यात आले. परीक्षार्थी करिता २.५ लाखाचे नगद बक्षीस ठेवण्यात आलेले आहे. विशेष म्हणजे राज्यातील इतर जिल्ह्यातूनही काही विद्यार्थी परीक्षेला बसले होते. परीक्षेच्या यशस्वी आयोजनासाठी शाळा महाविद्यालये मुख्याध्यापक, प्राचार्य, शिक्षकवृंद इतरेतर कर्मचारी, आयोजकांकडून नेमलेले पर्यवेक्षक यांनी सहकार्य केले. संविधान गौरव परीक्षेत सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थी परीक्षकांचे सहायक आयुक्त समाज कल्याण, संविधान परिक्षा आयोजन समिति अध्यक्ष प्रा. डॉ. दिशा गेडाम यांनी अभिनंदन केले.

# भूत आणणे म्हणजे नाटक करण्याची बिमारी–प्रा.प्रकाश धोटे

## गराडा येथे अंधश्रध्दा निर्मुलन प्रबोधन

**तिरोडा :–** भूत, भानामती ही अंधश्रध्दा आहे. भूत कुणीही पाहीले नाही. भूत पाहील्याचे जर कुणी सांगत असेल तर तो खोटा बोलत आहे. भूत अंगात आणणे म्हणजे नाटक करण्याची बिमारी असल्याचे प्रतिपादन अंधश्रध्दा निर्मुलन समितीचे जिल्हाध्यक्ष प्रा. प्रकाश धोटे यांनी केले.

गराडा ग्रामपंचायत येथे आज (ता.४) अंधश्रध्दा निर्मुलन समितीचा कार्यक्रम पार पडला. त्यावेळी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अतुल गजभिये होते. गराडा ग्रामपंचायतीचे उपसरपंच वेंकटेश रेवतकार, माजी उपसरपंच रविंद्र वंजारी, ग्राम पंचायत सदस्य मधुभाऊ हजारे, पोलिस पाटील प्रकाश मेश्राम, तंटामुक्त गाव समिती अध्यक्ष विनोद पटले, माजी ग्रामपंचायत सदस्य सुनिल उके, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुनील दखने यावेळी उपस्थित होते.

विद्यार्थी आणि गावकऱ्यांना मार्गदर्शन करतांना श्री. धोटे यांनी अंधश्रध्देवरील विविध प्रकारावर सखोल मार्गदर्शन केले. ते म्हणाले, मेल्यावर जर भूत बनत असेल तर दररोज कोंबड्या बकरे यांना कापले जाते. त्यांचे मांस घरी घेवून जातांना त्यांचे भूत का बनत नाही? असा सवालही त्यांनी याप्रसंगी उपस्थित केला.

दरम्यान हातावर कापूर जाळणे, लिंबू कापून त्यातून रक्त काढणे, लिंबातून कापड काढणे, कानाने चिठ्ठ्यावर लिहीलेल्या नावाचे वाचन करणे आदी प्रात्यक्षिक करून त्याचे शास्त्रीय कारण स्पष्ट केले. शिवाय भूत काढण्याचे आणि कुणाच्या अंगात भूत आलाच तर त्याला सूई टोचून वठणीवर आणण्याचे आवाहनही त्यांनी याप्रसंगी केले.

आयुष्य लहान आहे. ते महान



बनविण्यासाठी शिक्षणाची कास धरा. विज्ञानाने मानवी आयुष्य सुकर केले. मोबाईल मधुन दूरवर बोलता येते. स्पीकर आपला आवाज मोठा करतो. हे विज्ञानाचे चमत्कार केवळ शिक्षण आणि संशोधनातूनच शक्य झाल्याचे सांगून अतुल गजभिये यांनी भानामती, अंधश्रद्धा आणि तंत्रमंत्रावर कठोर प्रहार करीत डोळस होण्याचे आवाहन केले. तथा संत तुकाराम महाराज पासून तर संत गाडगेबाबा यांच्यापर्यंतच्या प्रबोधनाची अध्यक्षीय मार्गदर्शनातून माहीती दिली. माजी सरपंच रविंद्र वंजारी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून कार्यक्रम घेण्याची गरज विशद केली.

गराडा ग्रामपंचायतीचे उपसरपंच वेंकटेश रेवतकार, ग्राम पंचायत सदस्य मधुभाऊ हजारे यांनी समयोचित विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रविंद्र वंजारी यांनी करून आभार मानले. कार्यक्रमाला विद्यार्थ्यांसह गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ग्राम रोजगारसेवकांवर दबाव तंत्राचा वापर


**अर्जुनी मोरगाव:–** गेल्या ६ महिन्यांपासून मानधन देण्यात आलेले नाही. त्याचप्रकारे प्रवास आणि अल्पोहार भत्त्याचे पैसे देखील देण्यात आलेले नाही. अशास्थितीत उपाशीपोटी काम करण्यासाठी गटविकास अधिकारी दबाव आणत असल्याचा आरोप ग्राम रोजगार संघटनेकडून करण्यात आला आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेत ग्रामपंचायत स्तरावर रोजगार हमी योजनेची विविध कामे करण्यासाठी २००६–०७ मध्ये ग्रामपंचायत स्तरावर एका बेरोजगार व्यक्तीची ग्रामरोजगार सेवक म्हणून ग्रामसभेच्या माध्यमातून निवड करण्यात आली.

रोजगार हमी योजनेत वैयक्तिक लाभाच्या योजना व सार्वजनिक लाभाच्या योजना कार्यान्वित केल्या जातात व लाभ दिला जातो. त्याचप्रमाणे ग्रामपंचायत व शासकीयस्तर ५० टक्के प्रमाणे कामे केली जातात. शासकीय जीआरप्रमाणे ग्राम रोजगार सेवक हे पद अर्धवेळ स्वरूपाचे असून, इतर कामे करून ग्राम रोजगारसेवक पदाचे काम करणे आहे.

**सेवकांचे ८२ लाख रुपये सरकारकडे थकलेले**

अर्जुनी मोरगाव पंचायत समितीमध्ये २०१६–१७पासून ग्रामरोजगार सेवकांचे ग्रामरोजगार सेवकांचे अल्पोहार भत्ता प्रवास भत्ता शासनाकडे ८२ लाख रुपये सरकारकडे थकलेली आहे. हेसुद्धा पैसे शासन शासकीय जीआरप्रमाणे ग्राम रोजगार सेवकांना




देण्यात आलेले नाही. हे पैसे थकण्यामागे पंचायत समिती स्तरावर कार्यरत कर्मचाऱ्यांचा दोष दिसून येत आहे. मानधन वेळेवर दिले जात नाही. प्रवास भत्ता व अल्पपोहार भत्ता हेसुद्धा वेळेवर दिले जात नाही. मग ग्राम रोजगार सेवकांनी वेठबिगारीचे कामे करावी काय? असा प्रश्न ग्राम रोजगार सेवकांकडून विचारला जात आहे.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायक्षेत्र)

# ओबीसी नेत्यांनो! ईगो घरी ठेवून आंदोलनात सामील व्हा !

मनुवादयांनी पेटविलेल्या मराठा–ओबीसी वादात पडदयावर मराठा बांधव तर पडद्यामागे सर्वपक्षीय मराठा नेत्यांची एकजुट दिसुन येते. याउलट ओबीसी बांधवांची एकजुट दिसत असली तरी ओबीसी नेत्यांची एकजुट नाही, एकवाक्यता नाही, ओबीसींचे मोर्चे सर्वपक्षीय–सर्वजातीय सामुहिक नेतृत्वाखाली नाही. सर्वपक्षीय ओबीसी नेत्यांमध्ये समन्वय नाही. यावरून समाज आजही प्रामाणिक आहे पण नेतेच भरकटलेले दिसतात.

दुसरीकडे या वादावर कांग्रेस–भाजप, सेना राष्ट्रवादी सारखे पक्ष प्रेक्षकाच्या भुमिकेत आहेत, यावरून ते पक्ष हा वाद विझविण्याच्या नव्हे तर पेटविण्याच्या भुमिकेत दिसत असुन त्यातुन जातजनगणना कालबाह्य करण्याच्या वा पंचायत निवडणुकांमध्ये मतांचे राजकारण करण्याच्या भुमिकेत दिसत आहेत. असे असतांना ओबीसी नेत्यांनी पक्षांच्या या ज्वालाग्राही कृत्यात सामील होणे अधिक गंभीर, धोकादायक व समाजविघातक आहे.

खरेतर ही स्थिती मनुवादयांनी रचलेल्या पुर्वनियोजित कटाचा भाग आहे जो जातजनगणनेचा जिवनमरणाचा अत्यंत महत्वाचा प्रश्न कालबाह्य करण्यासाठी रचलेला आहे. तथापि आज यावर कोणताही पक्ष स्पष्टपणे बोलण्यास तयार नाही आणि अशाही परिस्थितीत वैयक्तिक इगोने ग्रस्त झालेले सर्वपक्षीय ओबीसी नेते एकत्र येवुन सामुहिक भुमिका घेण्यास तयार नाहीत त्यामुळे ओबीसी समाजात नेत्यांबाबत संभ्रमाचे व संतापाचे वातावरण दिसते.




मित्रांनो, कुठलीही मागणी, आंदोलने, मोर्चे नसतांना घटनादुरूस्ती करुन व ५०% ची मर्यादा ओलांडुन आधीच सर्वसोयीयुक्त उच्चवर्णियांना १०% आरक्षण मिळु शकते पण ७५ वर्षाच्या प्रदिर्घ संघर्षानंतरही वंचित ओबीसी–बहुजनांना वंचितच राहावे लागते. कारण बहुजन हा सत्तेच्या केंद्रस्थानी कधीच नव्हता, आजही नाही.

आयुष्यभर पक्षाची हमाली करण्यातच धन्यता मानणारे ओबीसी–बहुजनांचे नेते पक्षांचे मालक कधीच बनू शकले नाहीत. खरेतर नोकर स्वत:पुरते घेवू शकतो, इतरांना देवू शकत नाही. कारण त्यासाठी मालकाविरूदध बंडखोरी करावी लागते. म्हणूनच ओबीसींचे प्रश्न गेल्या ७५ वर्षामध्ये कां सुटले नाहीत याचे कारणही यामध्येच दडलेले आहे. म्हणूनच नेत्यांनो ! तुमचे पक्ष आजही ओबीसी आरक्षण वा जातजनगणनेच्या बाजुने नाहीत, ओबीसींच्या हातात सत्ता देण्याच्या बाजुने नाहीत. तेव्हा तुम्हाला खरंच ओबीसींच्या हिताचे काम करायचं असेल तर स्वपक्षाला विनंती करा, ओबीसींच्या ताकदीची जाणीव करून द्या, यानंतरही नाही मानल्यास पक्षाविरुद्ध बंड करा व मोर्च्यात सामील व्हा ! कारण मोर्च्यात जेव्हा सर्वपक्षीय ओबीसी नेते दिसतील तेव्हा सरकारला दखल घ्यावीच लागणार !

तेव्हा समाजऋण फेडण्याच्या हेतुने नेत्यांवर विसंबुन न राहता ओबीसीतील शिक्षक–प्राध्यापक, वकील–इंजिनिअर–डॉक्टर, व्यापारी–शेतकरी–शेतमजुर सर्वांनी सर्वजातीय सामाजिक नेतृत्वाखाली आंदोलनात सामील व्हावे. लक्षात ठेवा, या मोर्च्यात केवळ शिस्तबद्ध घोषणा असाव्यात, नेत्यांची भाषणे नकोत !

आंदोलन यशस्वी होणारच !

**प्रा. नामदेवराव जेंगठे,**
ओबीसी संघटना

# संवाद दौऱ्यातून जाणून घेतल्या नागरिकांच्या समस्या



**गोरेगाव:–** तालुक्यातील आंबेतलाव, कालिमाटी, हिराटोला येथे आ. राजकुमार बडोले यांनी ग्रामवासीयांच्या समस्या समजून घेण्याकरिता गाव संवाद दौरा ३ ऑक्टोबर रोजी आयोजित केला होता.जि. प. बांधकाम सभापती डॉ. लक्ष्मण भगत, पं. स. सभापती चित्ररेखा चौधरी, विश्वजीत डोंगरे, तहसीलदार, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती गिरधारी बघेले, मनोज बोपचे, माणिक भगत, फनिंद्र पटले, सोमेश्वर रहांगडाले, विविध विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

तालुक्यातील यांनी आंबेतलाव येथील उपसरपंच लोकराज बघेले प्रास्ताविकातून आंबेतलाव ते मक्कीटोला रस्ता, तलाव खोलीकरण, नागमंदिर सभामंडप, शाळेची जीर्ण इमारत पाडून नवीन इमारत आदी समस्या मांडल्या.यावर आ. बडोले यांनी या सर्व समस्या मार्गी लावण्याचे आश्वासन दिले आहे. तसेच जलजीवन मिशन अंतर्गत नळाचे पाणी ग्रामवासीयांना देण्याचे आदेश दिले. तसेच कालीमाती ग्रामपंचायत अंतर्गत संवाद दौऱ्यात सरपंच सोनाली साखरे यांनी ग्राम संघाकरिता नवीन इमारत, महादेव पहाडी येथे सभामंडप, जलजीवन मिशन मअंतर्गत पाणीपुरठ्याकरिता सन २०२३–२०२४ पासून मंजूर असलेल्या ६४ लाख रुपयांचे १,८०० मीटर पाइपलाइन, पाण्याच्या टाकीचे बांधकाम अपूर्ण असल्याचे सांगितले. यावर आ. बडोले यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना चौकशी करून कारवाई करण्याचे निर्देश दिले. पं.स.चे माजी सभापती मनोज बोपचे यांनी शेतकऱ्यांना २४ तास वीज पुरवठा करण्याची मागणी केली. यावेळी आ. बडोले यांनी गावकऱ्यांच्या समस्या जाणून घेत त्या मार्गी लावण्याचे निर्देश दिले.

# १.२३ लाख लाभार्थ्यांची आरोग्य तपासणी-डॉ.अभिजीत गोल्हार यांची माहिती



**गोंदिया:–** सेवा पंधरवड्यात मस्वस्थ नारी सशक्त परिवारफ हे अभियान राबविण्यात आले. महिलांचे आरोग्य आणि सक्षमीकरण हे कुटुंब, समाज आणि देशाच्या प्रगतीचे प्रमुख केंद्रस्थान आहे. या उद्देशाने महाराष्ट्र शासनामार्फत स्वस्थ नारी सशक्त परिवार हे राष्ट्रीय अभियान गोंदिया जिल्ह्यात सुद्धा राबविण्यात आले. १७सप्टेंबर ते २ ऑक्टोबर अभियानादरम्यान आरोग्य विभागाच्या जनजागृतीने नागरिकांनी आरोग्य तपासणी मोहिमेला उत्तम प्रतिसाद देत तब्बल १ लाख २३ हजार ९९७ नागरिकांनी तपासणीचा लाभघेतला. त्यात ४३९३८ पुरुष व ८००५९ महिला, असे एकुण १ लाख २३ हजार ९९७ लाभार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आल्याची माहीती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभिजीत गोल्हार यांनी दिली.

जिल्हाधिकारी प्रजित नायर, मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगानंथम, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष लायकराम भेंडारकर, उपाध्यक्ष तथा आरोग्य सभापती सुरेश हर्षे यांचे विशेष आवाहन तसेच जि. प. सदस्य, पं. स. सदस्य व ग्रा. पं. पदाधिकारी यांच्या सहकार्याने आरोग्य शिबिरादरम्यान मोठ्या संख्येने गावपातळीवरील महिला आपल्या आरोग्याची तपासणी करण्यासाठी पुढे आल्यात.

जिल्हाधिकारी प्रदीप नायर व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगानंथम यांच्या नेतृत्वाखाली संपन्न झाले असून, अंमलबजावणी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. पुरुषोत्तम पटले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभिजीत गोल्हार, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. तृप्ती कटरे, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अरविंदकुमार वाघमारे, माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. रोशन राऊत यांच्या अधिपत्याखाली केल्या गेले.

जिल्ह्यातील सर्व शासकीय रुग्णालय, आरोग्य संस्था या अभियानात सक्रिय सहभाग होता. जास्तीत जास्त महिलांनी या शिबिरात सहभागी होऊन आपली संपूर्ण आरोग्य तपासणी करून घ्यावी, असे आवाहन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. पुरुषोत्तम पटले व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभिजीत गोल्हार यांनी केले होते. कौटुंबिक जबाबदारी पार पाडताना नोकरी व्यवसाय सांभाळणाऱ्या महिलांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. मस्पर्धाफ हेच त्यामागील मुख्य कारण मानले जात आहे. फास्ट (जंक) फूड खाण्याची क्रेझ, व्यायाम नाही, अवेळी व अपुर्ण जेवण, अपुरी झोप, अतिरिक्त कामाचा ताण यामुळे आरोग्याकडे लक्ष द्यायलासुद्धा महिलांना वेळ मिळत नसल्याची वस्तुस्थिती आहे.

माता सर्वात जास्त दुःख, वेदना सहन करते. कौटुंबिक व नोकरी, शिक्षणाच्या व्यापारातून त्यांना स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष द्यायला वेळ मिळत नाही. पण, या अभियानातून त्यांना तणावमुक्ती व मनःशांतीसाठी योगा, व्यायाम करा, जंकफुड न खाता घरात बनवलेले पोष्टिक जेवण खा, पुरेशी झोप, आराम करा, नियमित तपासणी करणे व फळे खाण्याचा सल्ला जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभिजीत गोल्हार यांनी दिली आहे.

या अभियानांतर्गत जिल्ह्यातील सर्व शासकीय संस्थांमध्ये वैद्यकीय तपासणी व उपचार मोहिमा राबविण्यात आल्या. या कालावधित प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालय व उपकेंद्रे येथे विविध तपासणी शिबिरे आयोजित करण्यात येत असून, महिलांसाठी आरोग्य तपासणी, एनसीडी स्क्रीनिंग, क्षयरोग तपासणी, ॲनिमिया व सिकलसेल तपासणी, लसीकरण सेवा, मोतीबिंदू शस्त्रक्रिया, आहारविषयक जनजागृती, संसर्गजन्य रोग नियंत्रण, रक्तदान शिबिरे तसेच आयुष्मान भारत कार्ड व आभा कार्ड वितरण या सेवा नागरिकांना उपलब्ध करण्यात आले.

### मासिक पाळीबद्दल मोकळेपणाने बोलणे गरजेचे

**दुसरीकडे अजूनही सर्वत्र विशेषतः ग्रामीण भागातील मुली, महिला मासिक पाळीबद्दल मोकळेपणाने बोलत नाहीत. समस्यादेखील अनेकजण लपवितात. परंतु, तसे करणे भविष्यासाठी धोकादायक असल्याचे भान त्यांना करून देण्याची गरज आहे. गर्भाची वाढ न होणे तसेच गर्भवतीचे वजन, उंची कमी असल्याने प्रसुतीवेळी अडचणी निर्माण होतात. सृष्टीची निर्माता समजली जाणारी मतीफ सुरक्षित राहावी, या उद्देशाने हे अभियान राबविण्यात आले.**

# कोहळी समाज भवन निर्मितीसाठी निधी मंजूर करा

**नवेगावबांध :–** कोहळी समाज भवन निर्मितीसाठी निधी मंजूर करावा यासह अन्य मागण्यांसाठी कोहळी समाज विकास मंडळाच्यावतीने आमदार राजकुमार बडोले यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात, कोहली समाजभवन निर्मितीसाठी निधी मंजूर करावा, माजी मालगुजारी तलावांचे पुनरुज्जीवन व व्यवस्थापनात कोहळी समाजाचा सहभाग असावा, शासकीय समित्यांमध्ये समाजाचे प्रतिनिधित्व वाढवावे, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या उमेदवारांना प्राधान्य द्यावे, कोहळी समाजाचा सूक्ष्म अल्पसंख्याक म्हणून समावेश करण्यासाठी राज्यस्तरीय प्रयत्न व्हावेत, शेती उत्पादनाची वेळेवर खरेदी, हमीभाव व चुकारे सुनिश्चित करावे, कर्जमाफीनंतर शिल्लक बोनस (२० हजार रुपये हेक्टरी) न मिळालेल्या शेतकऱ्यांना लाभ मिळवून द्यावा आदी मागण्यांचा समावेश आहे. यावर आमदार बडोले यांनी, माजी मालगुजारी तलावांचे पुनरुज्जीवन आणि समाज भवनासाठी आर्थिक पाठबळ मिळवून देण्याचे, काही मुद्दे लक्षवेधी प्रस्तावाद्वारे सभागृहात मांडणार. तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार व खासदार प्रफुल्ल पटेल यांच्यासोबत समाजाच्या बैठकीचे आयोजन करणार आहोत.

**महाराष्ट्र शासन**

**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपुर**

**(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत उपक्रम**

**कार्यकारी अभियंता, वाघ इटियाडोह पाटबंधारे विभाग, गोंदिया**

**सिव्हील लाईन्स, गोंदिया-४४१६०१**

**दुरध्वनी क्रमांक-०७१८२-२३७३१५**

Email-gndbild@gmail.com

**ई-निविदा सुचना क्र.०६ सन २०२५-२६**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, बाघ इटियाडोह पाटबंधारे विभाग, गोंदिया जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरिता ब–१ नमुन्यातील ई–निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) ई–निविदा मागवत आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सुचना व ई–निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकांवर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याा अधिकार कार्यकारी अभियंता, बाघ इटियाडोह पाटबंधारे विभाग, गोंदिया यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदे सुचने मध्ये कही बदल होत असल्यास http://mahatenders.gov.in वेबसाईट वरती कळविण्यात येईल.

| अ.क्र. | कामाचे नांव | निविदेची अंदाजित किंमत रु. | इसारा/ बयाणा रक्कम | कोऱ्या निविदा संघाची किंमत | कंत्राटदाराचा वर्ग पात्रता | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | इटियाडोह प्रकल्पावरील अर्जुनी मोर उपविभाग, व गोठणगांव, अर्जुनी मोर, वडेगांव,लाखांदूर, बारव्हा शाखा कार्यालयासाठी चौकीदार बाह्य यंत्रणेमार्फत पुरविणे | रु.१९,९७,५२०/- | रू.२०,०००/- | रु.२,०००+ जिएसटी ३६० एकुण २,३६०/- | मुंबई दुकाने व संस्था अधिनियम –१९४८ महाराष्ट्र दुकाने व संस्था नियम–१९६९ अन्वये नोंदणकृत व मजुर पसारा प्रमाणपत्र महाराष्ट्र शासन खाजगी सुरक्षा व अभिकरणाचा व्यवसाय करण्यासाठी वैद्य नोंदणीकृत परवाना (Private Security Agencies Regulation Act-२००५) नोंदणीकृत कंत्राटदाराकरिता खुला) | १२ महिने |
| २. | इटियाडोह प्रकल्पावरील वडसा उपविभाग, कोरंभी वडसा,कोंढाळा, आरमोरी शाखा कार्यालयासाठी चौकीदार बाह्य यंत्रणेमार्फत पुरविणे | रु.१४,१६,९६०/- | रू.१४,५००/- | रु.२,०००+ जिएसटी ३६० एकुण २,३६०/- | मुंबई दुकाने व संस्था अधिनियम –१९४८ महाराष्ट्र दुकाने व संस्था नियम १९६९ अन्वये नोंदणकृत व मजुर पशारा प्रमाणपत्र महाराष्ट्र शासन खाजगी सुरक्षा व अभिकरणाचा व्यवसाय करण्यासाठी वैद्य नोंदणीकृत परवाना ( (Private Security Agencies Regulation Act-२००५) **नोंदणीकृत कंत्राटदाराकरिता खुला** | १२ महिने |
| ३. | इटियाडोह प्रकल्पावर सुरक्षा रक्षक तैनात करने. | १२,४८,६९६ | रु.१२,५००/- | रु.२,०००+ जिएसटी ३६० एकुण २,३६०/- | मुंबई दुकाने व संस्था अधिनियम –१९४८ महाराष्ट्र दुकाने व संस्था नियम–१९६९ अन्वये नोंदणकृत व मजुर पसारा प्रमाणपत्र महाराष्ट्र शासन खाजगी सुरक्षा व अभिकरणाचा व्यवसाय करण्यासाठी वैद्य नोंदणीकृत परवाना (Private Security Agencies Regulation Act-२००५) नोंदणीकृत कंत्राटदाराकरिता खुला) | १२ महिने |
| ४. | बाघ प्रकल्पाच्या सिरपुर धरणावर, पुजारीटोला धरणावर, आलीसरार धरणावर व पांढरवानी उसियो सुरक्षा रक्षक तैनात करणे. | रू.१२,५७,५५२/- | रु.१३,०००/- | रु.२,०००+ जिएसटी ३६० एकुण २,३६०/- | मुंबई दुकाने व संस्था अधिनियम मुंबई दुकाने व संस्था अधिनियम –१९४८ महाराष्ट्र दुकाने व संस्था नियम–१९६९ अन्वये नोंदणकृत व मजुर पसारा प्रमाणपत्र महाराष्ट्र शासन खाजगी सुरक्षा व अभिकरणाचा व्यवसाय करण्यासाठी वैद्य नोंदणीकृत परवाना (Private Security Agencies Regulation Act-२००५) नोंदणीकृत कंत्राटदाराकरिता खुला) | १२ महिने |
| ५. | इटियाडोह मुख्य कालव्यावरील शाखा गोठणगाव अंतर्गत सा.क्र.५९५५ मी. वरील मायनर न.२ (अ) च्या मुख्य विमोचकाची दुरुस्ती, सा.क्र.५३४० मी. वरील डी.ओ.च्या मुख्य विमोचकाची दुरुस्ती सा.क्र.४१४० मी.वरील डी.ओ.च्या मुख्य विमोचकाची दुरुस्ती, सा.क्र.६००० मी.वरिल पुलाच्या भिंतीचे दुरुस्ती काम करणे. | रु.३०,३७,१६५/- | रु.३०.५००/- | रु.२,०००+ जिएसटी ३६० एकुण २,३६०/- | महाराष्ट्र शासन सा.बा. विभागाकडे पंजीकृत वर्ग–अ (मजूर सहकारी संस्था गोंदिया जिल्हा करिता) | ०६ महिने |

१) ई–निविदा उपलब्ध कालावधी :– दिनांक ०६.१०.२०२५ वेळ १०.०० ते दिनांक १३.१०.२०२५ वेळ १७.०० पर्यंत

२) ई–निविदा उघडण्याचा :– दिनांक १४.१०.२०२५ वेळ १७.०० वाजता

१) संकेतस्थळ http://mahaternders.gov.in

(संदर निविदेसुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)

२) कार्यकारी अभियंता कार्यालयातून ई–निविदा कोरी प्रपत्रे विकली जाणार नाहीत.

३) सविस्तर ई–निविदा सुचना महाराष्ट्र शासनाचे इलेक्ट्रॉनिक टेन्डर management http://mahandender.gov.in वर तसेच कार्यकारी अभियंता, बाघ इटियाडोह पाटबंधारे विभाग, गोंदिया कार्यालयातील नोटीस बोर्डावर पहावयास मिळेल.

४) या कामाचे अंदाजपत्रक, दर विश्लेषन, मोजमापे, नकाशे इत्यादी कार्यकारी अभियंता कार्यालयात उपलब्ध आहेत.

५) संकेत स्थळावर प्रसिद्ध होणाऱ्या वेळापत्रकानुसार निविदा उघडण्याची तारीख व वेळेप्रमाणे कंत्राटदाराने किंवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधीने उपस्थित राहावे. अन्यथा निविदा उघडल्यास कोणतीही तक्रार स्विकारली जाणार नाही.

६) कामाचा जिल्हा गोंदिया, गडचिरोली आहे.

क्र.संमावज/नाग/४३१/२०२५

**(सोनाली एस.सोनुले)**
**कार्यकारी अभियंता**
**बाघ इटियाडोह पाटबंधारे विभाग**
**गोंदिया**

# औषध निर्माण अधिकारी हा आरोग्य सेवेतील महत्त्वाचा घटक



**गोंदिया :–** औषध निर्माण अधिकारी यांच्याद्वारे सामान्य रुग्णांपर्यंत समुपदेशनपासून औषध वितरण पर्यंत सर्व सेवा पुरवल्या जातात. यामुळे औषध निर्माण अधिकारी हा आरोग्य सेवेतील महत्त्वाचा घटक तसेच डॉक्टर व रुग्णांमधील महत्त्वाचा दुवा आहे असे प्रतिपादन जिल्हा परिषद उपाध्यक्ष सुरेश हर्षे यांनी केले.

जिल्हा परिषद कार्यालयात २५ सप्टेंबर रोजी जागतिक फार्मासिस्ट दिनानिमित्त आयोजित फार्मसी डे कार्यक्रमात मार्गदर्शन करताना ते बोलत होते. कार्यक्रमाला जि.प. अध्यक्ष लायकराम भेंडारकर, मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगानंथम, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. तानाजी लोखंडे, कृषी व पशू संवर्धन सभापती दीपा चंद्रिकापुरे, सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी फरेंद्र कुतिरकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभिजीत गोल्हार, सहायक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अरविंद वाघमारे, जिल्हा माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. रोशन राऊत, जिल्हा साथरोग अधिकारी डॉ. निरंजन अग्रवाल, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. नीलेश जाधव, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी विजय आखाडे प्रामुख्याने उपस्थित होते. याप्रसंगी मुरुगानंथम यांनी, औषध निर्माण अधिकाऱ्यांनी सदैव कृतिशील राहून रुग्णांशी संवाद साधून आरोग्य संस्थेत औषध व साहित्य पुरवून त्याची नोंद व्यवस्थित ठेवणे आवश्यक असल्याचे सांगीतले.

**औषध निर्माण अधिकाऱ्यांचा केला सत्कार**

या कार्यक्रमात आरोग्य संस्थेतील औषध निर्माण अधिकाऱ्यांचा त्यांच्या वेगवेगळ्या उल्लेखनीय कार्य व उत्कृष्ट सेवेसाठी मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. त्यानंतर सभागृहात उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते फार्मसी शपथ घेण्यात आली.

**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर (महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत उपक्रम)**

**कार्यकारी अभियंता गोंदिया पाटबंधारे विभाग, गोंदिया**

(ई–मेल eegidvngondia@gmail.com) दूरध्वनी क्र.०७१८२–२३७०७७

ई–निविदा सुचना क्र.०३/गोपावि/२०२५–२६

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने, कार्यकारी अभियंता गोंदिया पाटबंधारे विभाग, गोंदिया ता.जि.गोंदिया ह्यांचे कार्यालयाकडून खालील कामाकरिता ब–१ नमुन्यातील ई–निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) द्वारे स्वीकारली जाईल. निविदा महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत योग्य त्या वर्गात पंजीबद्ध असलेल्या मजून सहकारी संस्था गोंदिया/सुशिक्षीत बेरोजगार अभियंता गोंदिया कडून निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावे. तसेच संपूर्ण निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदेची अंदाजित किंमत रू. | इसारा/बयाणा रक्कम | कोऱ्या निविदा संचाची किंमत | कंत्राटदाराचा वर्ग पात्रता | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | पाटबंधारे उपविभाग, सन २०२५–२६ करिता नवेगावबांध अंतर्गत खरीप सिंचन व्यवस्थापनाचे काम. | रू.१६,६९,५७६/– | रु.१७,०००/– | रु.२,३६०/– (जीएसटीसह) | मजुर सहकारी संस्था जिल्हा गोंदिया | ०४ महिने |

**अ) निविदा विक्री कालावधी :–**दि. १०.१०.२०२५ ते दि.१७.१०.२०२५ (सकाळी १०.०० ते सायं.१७.०० वाजे पर्यंत)

**ब) निविदा सादर करण्याचा शेवट चा दिनांक :–१७.१०.२०२५ वेळ १७.०० वाजेपर्यंत!**

क्) **निविदा उघडण्याचा कालावधी :– दि.२०.१०.२०२५ वेळ ११.०० वाजेपासून**

**(सदर निविद सुचनेत काही बदल होत असल्यास फक्त वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)**

१) कार्यकारी अभियंता कार्यालयातून ई–निविदा कोरी प्रपत्रे विकली जाणार नाहीत. २) सविस्तर ई–निविदा सुचना महाराष्ट्र शासनाचे इलेक्ट्रॉनिक टेन्डर management http://mahandender.gov.in वर तसेच कार्यकारी अभियंता, गोंदिया कार्यालयातील नोटीस बोर्डावर पहावयास मिळेल. ३) या कामाचे अंदाजपत्रक, दर, विश्लेषन, मोजमापे, नकाशे ई. कार्यकारी अभियंता कार्यालयात उपलब्ध आहेत.निविदाकार प्रत्यक्ष कार्यक्षेत्र परिस्थितीनुसार दर भरण्यास जबाबदार राहतील आणि याकरिता कोणताही प्रकारचे दावे (claims) निविदाधारकास देय राहणार नाही. ४) कोणतेही कारण न देता निविदा नाकारण्याचा अथवा रद्द करण्याचा अधिकार सक्षम अधिकाऱ्यांने राखून ठेवला आहे.

जिमाका/गों/जाहि/५५/२०२५

**(राजीव गो.कुरेकार)**
**कार्यकारी अभियंता**
**गोंदिया पाटबंधारे विभाग, गोंदिया**

# प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांना आर्थिक मदतीचे जि.प.अध्यक्षांचे आश्वासन



**अर्जुनी मोरगाव :–** तालुक्यातील खांबी व शिरेगाव या दोन प्रादेशिक पाणीपुरवठा योजना सध्या पाणी मंडळामार्फत चालवल्या जात असून, या योजनांच्या देखभाल व संचालनात मोठी आर्थिक तूट निर्माण झाल्याने मंडळांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. या संदर्भात जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भंडारकर यांना निवेदन देण्यात आले.

अर्जुनी मोरगाव तालुक्यात एकूण चार प्रादेशिक पाणीपुरवठा योजना कार्यरत आहेत. त्यापैकी खांबी व शिरेगाव योजना चालविण्यासाठी कनेक्शन धारकांकडून मिळणारे उत्पन्न आणि प्रत्यक्षात येणारा खर्च यात मोठी तफावत असल्याने मंडळांना आर्थिक तोटा सहन करावा लागत आहे.

या पार्श्वभूमीवर पाणी मंडळांनी दिनांक १ एप्रिल २०२५ पासून योजना बंद करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भंडारकर यांनी थेट हस्तक्षेप करून मंडळांना आश्वासन दिले होते की, त्यांच्या तोट्याची भरपाई जिल्हा परिषदेकडून करण्यात येईल.

तथापि, आजअखेर मंडळांना अंदाजे दहा लाख रुपयांची भरपाई मिळालेली नाही. त्यामुळे मंडळांच्या वतीने निवेदन देण्यात आले असून, या निवेदनावर सकारात्मक चर्चा झाली. यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भंडारकर यांनी येणाऱ्या चार दिवसांत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यपालन अधिकारी यांच्या उपस्थितीत विशेष बैठक घेऊन दहा लाख रुपयांची मदत तातडीने करण्याचे आश्वासन दिले.

या प्रसंगी किशोर तरोणे (अध्यक्ष, सुजल एनजीओ), टीकाराम कापगते (अध्यक्ष, शिरेगाव बांध प्रादेशिक पाणीपुरवठा मंडळ), कालिदास पुसतोळे (सचिव, सुजल एनजीओ), नीलकंठ बोरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

## ग्राम पंचायत कार्यालय बोरी
## पंचायत समिती अर्जुनी/मोर.जि.गोंदिया
## निविदा सुचना क्र.१(पहिली वेळ) सन २०२५-२६

ग्रा.पं.कार्यालय बोरी पंचायत समिती अर्जुनी/मोर. जिल्हा परिषद गोंदिया येथे जिल्हा वार्षिक योजनेच्या सन २०२४–२५ चे निधीतून प्रा.उपकेंद्र बोरी येथे किरकोळ दुरुस्ती बांधकाम करणे या कामाकरिता लागणारे साहित्य बांधकामाच्या जागेवर पोहचते दरानी GST धारक नोंदणीकृत पुरवठाधारक यांचे कडून मोहरबंद द्विलिफाफा पद्धतीने साहित्य खरेदीच्या ऑफलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. निविदेची विस्तृत जाहीरात ग्रा.पं.कार्यालय बोरी सुचना फलकावर प्रसिद्ध करण्यात आली असून निविदेतील अटी व शर्तीनुसार इच्छुक GST धारक नोंदणीकृत पुरवठाधारक यांनी साहित्य खरेदीच्या निविदा सादर कराव्या. निविदा सोबत १०००/– रु कोरे निविदा फी सोबत ५००/– ने भरुन ग्रा.पं.बोरीच्या नावे द्यावा लागेल. उपरोक्त फी भरल्याशिवाय निविदा स्वीकारल्या जाणार नाही.

**–: निविदेचे वेळापत्रक :–**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा प्रसिद्धी | ०८/१०/२०२५ |
| २ | कोरे निविदा प्रपत्र रु.फी ५००/– ने भरुन ग्रा.पं.कार्यालयातून प्राप्त करणे. | दि.०८/१०/२०२५ ते १४/१०/२०२५ सायं. ५.०० वाजे पर्यंत कार्यालयीन वेळेत |
| ३ | निविदा दाखल करण्याची सुरुवात दिनांक | ०८/१०/२०२५ |
| ४ | निविदा दाखल करण्याची अंतिम दिनांक | १४/१०/२०२५ सायं.५.०० वाजेपर्यंत |
| ५ | निविदा उघडण्याचा शक्यतो दिनांक | १५/१०/२०२५ |

**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रा.पं.बोरी**

**सरपंच**
**ग्रा.पं.बोरी**

## ग्रामपंचायत कार्यालय मोहगाव बु.
## पंचायत समिती गोरेगांव, जिल्हा गोंदिया
## निविदा सुचना क्र.२/२०२५-२६ (पहिली वेळ)

ग्राम पंचायत मोहगाव बु.ता.गोरेगांव जि.गोंदिया अंतर्गत सन २०२५/२६ या वर्षात विविध योजना अंतर्गत १) विद्युत फिटींग व दुरुस्ती करीता तुकडोजी सभागृह, सावित्रीबाई फुले सभागृह, वाचनालय निधी १.०० लक्ष रू. २) वृक्ष लागवड व चौक सुसोभिकरणाकरिता तुकडोजी चौक मोहगाव बु.निधी १.५० लक्ष रुपये ३) सर्व शाळा व आंगनवाडी आरो दुरुस्ती करीता निधी ९०४०७/–रुपये ४) पदाधिकाऱ्याचा अभ्यास दौरा करीता निधी १.०० लक्ष ५) टी.बि.मुक्त ग्रामपंचायत व प्रचार प्रसिद्धी करणे ५००००/– रु वरील कामे करण्याकरिता २ लिफाफे पद्धतीने बी १ टक्केवारी दराने ऑफलाईन निविनदा संबीधाता (GST धारक) कंत्राटदारा कडून मागविण्यात येत आहे. सदर निविदा बाबद केवळ ऑफलाईन पद्धतीने सादर कराव्याची असून निविदा बाबद इतर सवीस्तर माहिती ग्राम. पंचायत कार्यालय मोहगाव बु. च्या सुचना फलकावर उपलब्ध आहे.

| | |
|---|---|
| निविदा प्रसिद्धी | ०५.१०.२०२५ |
| निविदा ऑफलाईन भरणा | ०५.१०.२०२५ ते ११.१०.२०२५ सायं.५.०० वा.पर्यंत |
| निविदा उघडणे | ग्रा.पं.मासिक सभेत |
| निविदा शुल्क व अनामत रक्कम भरणा करणे | ग्रामपंचायत मोहगाव बु.खाते क्र.०११०३०३०००००००४० बँकेचे नाव–जि. डी.सी.सी.बँक शाखा गोरेगांव, बँकेचे IFSC Code क्र.UTIBOSGDCO1 या खात्यावर RTGS/NEFT/Direct Transfer किंवा ग्रामपंचायत मोहगाव बु.येथे रोखीने भरणा करणे. |

**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रा.पं.मोहबाव बु.**

**उपसरपंच**
**ग्रा.पं.मोहबाव बु.**

**सरपंच**
**ग्रा.पं.मोहबाव बु.**

# नवनियुक्त उमेदवारांनी लोकाभिमुख व पारदर्शीतेने कार्य करावे-पालकमंत्री बाबासाहेब पाटील



## जिल्ह्यातील २२१ उमेदवारांना नियुक्तीपत्र प्रदान

**गोंदिया :-** महाराष्ट्र राज्यात अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या अनुकंपा नियुक्त्या मार्गी लावून राज्यात १० हजार पेक्षा जास्त उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्याचे कार्य शासनामाफ ेत करण्यात आले असून आज जिल्ह्यातील २२१ उमेदवारांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले आहे. शासन सेवेत नव्याने रुजू झालेल्या सर्व उमेदवारांनी जन-तेची सेवा करुन शासनाच्या विविध योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहचविण्याचे कार्य लोकाभिमुख व पारदर्शी पध्दतीने करावे, असे प्रतिपादन राज्याचे सहकार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री बाबासाहेब पाटील यांनी केले.

(ता.४) नविन नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालया गोंदिया येथे मुख्यमंत्री महोदयांच्या १५० दिवसांच्या कार्यक्रमांतर्गत अनुकंपा तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या उमेदवारांना नियुक्ती आदेश वितरण आयोजित कार्यक्रमाप्रसंगी ते दूरदृश्य प्रणा-लीद्वारे बोलत होते. जिल्हाधिकारी प्रजित नायर, पोलीस अधीक्षक गोरख भामरे, उपवनसंरक्षक पवन जोंग, निवासी उपजिल्हाधिकारी भैय्यासाहेब बेहेरे यांची यावेळी प्रामुख्याने उपस्थिती होती.

पालकमंत्री पाटील म्हणाले, हा उपक्रम मुख्यमंत्री यांच्या सुशासन व पारदर्शक भरती प्रक्रियेच्या संकल्पनेशी सुसंगत असून जिल्ह्यातील युवकांना शासन सेवेत नवी दिशा व प्रेरणा मिळणार आहे. शासनाच्या प्राप्त सूचनेनुसार आज अनुकंपा तत्वावर व महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत नियुक्ती झालेल्या उमेदवारांना नियुक्तीचे आदेश वितरीत करण्यात येत आहे, त्या सर्वांचे मी मना-पासून अभिनंदन करतो. शासन सेवेत अधिकाधिक चांगले काम करावे. शासन सेवेत नव्याने रुजू झालेल्या उमेदवारांकडून सर्वसाम ान्य जनतेच्या गरजा लक्षात घेवून जनतेची लोकाभिमुख कामे होतील अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

जिल्हाधिकारी नायर म्हणाले, शासन सेवेत नव्यानेच रुजू झालेल्या उमेदवारांना जनतेची सेवा करण्याची संधी उपलब्ध झालेली आहे, त्या संधीचे आपण सोने केले पाहिजे. शासन सेवेत प्रामाणिक व पारदर्शकपणे काम करावे. सर्वसामान्य लोकांच्या अडीअडचणी सोडविणे हे पुण्याईचे काम आहे. यावर्षी जिल्हा परिषद व इतर विभागात जवळपास ३५० उमेदवारांना नियुक्तीचे आदेश देण्यात आलेले आहे असे त्यांनी सांगितले.

पोलीस अधीक्षक श्री. भामरे म्हणाले, शासनस्तरावर अनुकंपा तत्वावर नियुक्ती देणे हे बऱ्याच दिवसापासून प्रलंबित होते. आता मुख्यमंत्र्यांच्या १५० दिवसाच्या कार्यक्रमांतर्गत अनुकंपा तत्वावर आज नियुक्ती आदेश वितरीत करण्यात येत आहे. आज आपण शासनाच्या सेवेत प्रवेश करीत आहेत, त्यामुळे आपणास थेट जनतेमध्ये जावून लोकांची सेवा करण्याची संधी उपलब्ध झाली आहे. आपल्या पुढील सेवा काळात आपल्या हातून सर्वसामान्य जन-तेला शासनाची चांगली सेवा मिळेल अशी आशा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

उपवनसरंक्षक जोंग म्हणाले, मुख्यमंत्र्यांच्या १५० दिवसाच्या उपक्रमांतर्गत अनुकंपा तत्वावर उम ेदवारांना नियुक्ती आदेश वितरीत करण्यात येत आहे, ही नविन पिढील एक चांगली संधी आहे, या संधीचे सोने करावे. सर्वसामान्य जनतेचे आयुष्य सुखकर व्हावे यासाठी खारीचा वाटा द्यावा असे त्यांनी सांगितले. याप्रसंगी अनुकंपा तत्वावर व महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत नियुक्ती झालेल्या एकूण ७ उमेदवारांनी यावेळी आ-पले मनोगत व्यक्त करुन शासनाचे आभार मानले.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरुपात सचिन सोनवाने गट-ड (अनुकंपा), विजयकुमार मेश्राम गट-ड (अनुकंपा), अश्विनकुमार गजभिये गट-क (अनुकंपा), शिशिर भोयर गट-क (एम.पी.एस.सी.), स्नेहा मेश्राम गट-क (एम.पी.एस.सी.), योगेश भोगे गट-क (एम .पी.एस.सी.), अंकीत दोनोडे गट-क (एम.पी.एस.सी.), चंद्रकात वाट गट-क (एम.पी.एस.सी.), मुकेश चाकोटे गट-क (एम.पी.एस.सी.), प्रणाली देशमुख गट-क (एम .पी.एस.सी.), अश्विनी थोरात गट-क (एम.पी.एस.सी.), अमोल कस्तुरे गट-क (एम.पी.एस.सी.), मिलींद परशुरामकर गट-क (अनुकंपा), देवाशिष बिसेन वाहनचालक (अनुकंपा), शालु कावळे गट-क (अनुकंपा), शोयब खान गट-ड (अनुकंपा), वैभव गोहणे गट-क (एम.पी.एस.सी.), अपर्णा नुन्हारे गट-क (अनुकंपा), सिध्दी वालदे गट-क (अनुकंपा) यांना नियुक्ती आदेश वितरीत करण्यात आले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी राजन चौबे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार तहसिलदार समशेर पठाण यांनी म ानले. कार्यक्रमास विविध विभागाचे नियुक्ती प्राधिकारी व अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ९१९ गावांची नजरअंदाज पैसेवारी ५० पैशांवर

| तालुका | जाहीर केलेल्या गावांची संख्या | ५० पैशांवर पैसेवारी असलेली गावे |
|---|---|---|
| गोंदिया | १५३ | १५३ |
| गोरेगाव | ९४ | ९४ |
| तिरोडा | १२३ | १२३ |
| अर्जुनी मोरगाव | १४८ | १४८ |
| देवरी | १२८ | १२८ |
| आमगाव | ८३ | ८३ |
| सालेकसा | ८६ | ८६ |
| सडक अर्जुनी | १०४ | १०४ |
| एकूण | ९१९ | ९१९ |

**गोंदिया :-** खरीप हंगामातील पिकांची स्थिती व उत्पादनाची नजर अंदाज पैसेवारी ३० सप्टेंबरला काढली जाते. जिल्ह्यातील ९९५ गावांपैकी ९१९ गावांतील शेतजमिनीवर विविध पिकांची लागवड केली जाते. तर पिकांची लागवड न केलेल्यांमध्ये ३६ गावांचा समावेश आहे. गावांतील ९१९ पिकांची नजरअंदाज पैसेवारी ही ५० पैशांच्या वर आहे. त्यामुळे जिल्ह्यातील पीकस्थिती समाधानकारक असल्याचे चित्र आहे. तर अंतिम पैसेवारी ही ३० डिसेंबरला प्रशासनाकडून जाहीर केली जाते.



पैसेवारीच्या स्थितीवरुन सरासरी किती उत्पादन होणार याचा अंदाज बांधला जातो. शासनाकडून सोयीसवलती दिल्या जातात. त्यामुळे शेतकऱ्यांच्या दृष्किोनातून पैसेवारीला फार महत्त्व आहे. पैसेवारीच्या स्थितीवरून यावर्षी पीकस्थिती कशी आहे, तसेच सरासरी किती उत्पादन होणार याचा अंदाज बांधला जातो. त्यामुळे याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले असते. जिल्ह्यात खरिपात १ लाख ९६ हजार हेक्टरवर धानाची लागवड करण्यात आली आहे. सध्या हलके धान निघण्याच्या मार्गावर आहे. तर मध्यम आणि जड स्वरूपाचे धान निघण्यास जवळपास महिना दीड महिन्याचा कालावधी शिल्लक आहे. यंदा जून ते सप्टेंबर या कालावधीत सरासरी ९९ टक्के पावसाची नोंद झाली आहे. एवढा पाऊस धान पिकासाठी अनुकूल मानला जातो. त्यामुळेच जिल्ह्यात पीकस्थिती ही समाधानकारक असल्याचे महसूल विभागाने जाहीर केलेल्या नजरअंदाज पैसेवारीवरून दिसून येते.

**गोरेगाव तालुक्याची नजरअंदाज पैसेवारी सर्वाधिक**

जिल्ह्यात ९५५ महसूल गावे असून, त्यातील ३६ गावांत पीक घेतले जात नाही. खरीप हंगामाखाली २ लाख २ हजार ८४९.१८ हेक्टर जमिनीपैकी १ लाख २६ हजार ३६५ हेक्टर क्षेत्राखाली धानाची लागवड करण्यात आली.जिल्हा प्रशासनाकडून नजरअंदाज पैसेवारी जाहीर करण्यात आली आहे. यात गोरेगाव तालुक्यातील २४ गावांत १ रुपये ०८ पैसे नजरअंदाज पैसेवारी जाहीर केली,ती सर्वाधिक आहे.

# अधिकाऱ्यांनीच दिले कारवाई थांबविण्याचे आदेश



**गोंदिया :-** जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात रेतीचा अवैध उपसा करून विक्री सुरू आहे. हा प्रकार संबंधित विभागाच्या निदर्शनास आहे. मात्र थातुरमातूर कारवाई करून प्रकरण दाबण्यात येतात. काही ठिकाणी रेती तस्करांच्या विरोधालाही अधिकाऱ्यांना समोर जावे लागले आहे. तर दुसरीकडे एक नवीनच प्रकार समोर आला आहे. कारवाई करणाऱ्या एका महिला तलाठीला अधिकाऱ्यांनीची कारवाई थांबविण्याचे निर्देश दिले. हा प्रकार तिरोडा तालुक्यातील बिरोली रेती घाटावरील आहे.

सविस्तर असे की, तिरोडा तालुक्यातील बिरोली येथील वैनगंगा नदीच्या घाटातून पोकलेंडच्या सहाय्याने वाळूचा उपसा करत असल्याची माहिती तेथील महिला तलाठीला मिळली. याआधारे त्यांनी ३ ऑक्टोबर रोजी सकाळी ६ वाजता घटनास्थळाला भेट देऊन वाळूचा उपसा व वाह-तूक करणाऱ्यांना हटकत कारवाई केली. दरम्यान या प्रकरणाची माहिती रेती तस्करांनी विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांना दिली. त्यावर वरीष्ठ अधिकाऱ्यांकडून त्या महिला तलाठीचे

कौतुक करण्याऐवजी उलट त्यांना तंबी देत कारवाई थांबविण्याचे निर्देश देण्यात आले. महत्वाचे म्हणजे, कारवाई होत असतानाचे प्रकार सोशल मीडियावर व्हायरल झाले. या घटनेमुळे महसूल विभागातील काही अधिकारी व वाळू माफीयांचे सोटेलोटे समोर आले आहे.

बिरोली येथील रेती घाटावर संबंधित महिला तलाठीने पाहणी केली असता वाळूने भरलेले

**रेतीघाट लिलावादरम्यान संबंधित कंत्राटदारानी दोन वर्षाचा करारनामा केला आहे. त्यात १ ऑक्टोबर पासून वाळू घाट सुरु झाले आहे. तलाठीला कारवाई करण्यापासून थांबविले नसून सदर कंत्राटदाराचे ऑनलाइन नोंदणी तपासण्याबाबत सुचना दिली आहे.**

**- नारायण ठाकरे, तहसीलदार, तिरोडा**

जवळपास ४० ते ५० ट्रॅक्टर घाटातून वाहतूक ५ क करताना मिळून आले. दरम्यान, त्यांनी संबंधित ट्रॅक्टर चालकांना वाळू उपसा व वाहतूक परवानाची मागणी केली असता चालकांनी याबाबतचे कसलीच कागदपत्रे नसल्याचे सांगितले. तेव्हा सर्व ट्रॅक्टरथांबवून या संदर्भातील माहिती त्यांनी वरिष्ठ अधिकारी तिरोडाचे तहसीलदार यांना दिली. मात्र, तहसीलदारांनी संबंधित अवैध वाळू उपसा करणाऱ्या कंत्राटदारावर कोणतीही कारवाई करू नये व घटनास्थळावरून निघून जावे, अशा सूचना दिल्याचे समजते. विशेष म्हणजे, महिला तलाठी घटनास्थळी असताना त्यांच्या सुरक्षेसाठी पोलिस विभागालाही कोणतीही माहिती देण्यात आली नाही. दरम्यान, तलाठींनी सर्व कारवाई करत असतानाचा व्हिडिओ समाज माध्यावर व्हायरल झाला असून महसूल विभाग व वाळू माफीयांचे सोटेलोटे उघडकीस आले आहे. तर या घटनेनंतर जिल्ह्यात अनेक चर्चा रंगल्या आहे. शासनाने या प्रकरणात लक्ष घालून ठोस उपाययोजना करावे अशी मागणी होत आहे.

# शिक्षक एकस्तर पदोन्नतीमधील अन्यायकारक तफावत दूर करा

## एस-१४ चा लाभ देण्यात यावा

**प्राथमिक शिक्षकांना चटोपाध्याय वेतनश्रेणीवर एकस्तर प्रमाणे वेतन निश्चिती न करता प्राथमिक शिक्षक पदाचे पदोन्नतीचे पद उच्चश्रेणी मुख्याध्यापक असल्याने त्यांना एकस्तर पदोन्नती अंतर्गत एस १३ ऐवजी एस १४ चा लाभ वेतनवाढीचा देण्यात यावा, सोबतच पदवीधर शिक्षक, उच्चश्रेणी मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख पदावरील शिक्षकांना पद-ोन्नतीचे वरिष्ठ पद वरिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी पद असल्याने सदर पदाची वेतनश्रेणी देण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आलेली आहे**

**गोंदिया:-** एकस्तर पदोन्नतीम धील अन्यायकारक तफावत दूर करण्यात यावी, यासह अन्य १९ प्रलंबित मागण्यांची पूर्तता करण्यात यावी. अन्यथा १३ ऑक्टोबर रोजी तीव्र आंदोलन करू, असा इशारा महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे जिल्हाध्यक्ष संदीप तिडके यांनी दिला आहे. यासंदर्भातील निवेदन - शिक्षणाधिकारी, जि. प. अध्यक्ष, मुख्याधिकारी यांना दिले आहे.



नक्षलग्रस्त व आदिवासी क्षेत्रात कार्यरत असलेल्या शिक्षकांना एकस्तर पदोन्नती न वेतनश्रेणीत सुधारणा करण्यात यावी, न राज्यातील आदिवासी व नक्षलग्रस्त घोषित क्षेत्राचा विकास करण्याच्या दृष्टीने व तेथील कार्यरत कर्मचाऱ्यांना प्रोत्साहनपर एकस्तर व पदोन्नतीची वेतनश्रेणी लागू करण्यासंदर्भात सामान्य प्रशासन विभागाने ६ ऑगस्ट २००२ चा शासन आदेश निर्गमित केला. गोंदिया जिल्ह्यातसुद्धा प्राथमिक शिक्षकांना डे एकस्तर वेतनश्रेणीचा लाभ देण्यात येत आहे. परंतु, सदर लाभ दोषपूर्ण असून, शासन निर्णयातील तरतुदीनुसार अजूनही जिल्ह्यातील शिक्षकांना एकस्तर पदोन्नती लाभांपासून वंचित असून, सामान्य प्रशासन विभागाचे दिनांक ६ ऑगस्ट २००२ या शासन निर्णयानुसार गट अ ते गट ड मधील कर्मचाऱ्यांनी धारण केलेल्या मूळ पदाच्या नजीकची पदोन्नतीची वेतनश्रेणी व त्या अनुषंगाने वेतन निश्चितीचा लाभ देण्यात यावा, असे शासन निर्णयात नमूद आहे.

सोबतच जिल्हा अंतर्गत बदली झालेल्या शिक्षकांना कार्यमुक्त करणे, शासन निर्णयानुसार सन अग्रिम दिवाळीपूर्वी अदा करणे, सरसकट पदवीधर शिक्षकांना वेतनश्रेणी लागू करणे, निवड श्रेणीमधील तफावत दूर करून सर्वप्रकरण निकाली काढणे, पदोन्नतीचे सर्व प्रकरण निकाली काढणे, प्रत्येक केंद्रावर डाटा ऑपरेटरची नेमणूक करण्यासह विविध १९ मागण्यांचे निवेदन जिल्हा प्रशासनाला शिक्षक समितीच्या वतीने देण्यात आले आहे. सदर मागण्या निकाली न निघाल्यास महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या वतीने धरणे आंदोलन केले जाणार आहे.

# दिवाळीपूर्वी वेतन अदा करा : आमदार सुधाकर अडबाले

गडचिरोली :- ऑक्टोंबर २०२५ पासून दिवाळीचा सण सुरु होत आहे. देशासह राज्यात दिवाळीचा सण मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात येतो. त्यामुळे राज्यातील सर्व अधिकारी, कर्मचारी तसेच शालेय शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण, आदिवासी विकास, इतर मागास बहु. कल्याण व कौशल्य व उद्योजकता विभागाअंतर्गत कार्यरत / सेवानिवृत्त सर्व शिक्षक, प्राध्यापक, सर्व निदेशक व कर्मचारी यांचे ऑक्टोबरचे वेतन दिवाळीपूर्वी अदा करण्यात यावे, अशी मागणी नागपूर विभाग शिक्षक मतदार संघाचे आमदार सुधाकर अडबाले यांनी मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री तसेच पाचही विभागाच्या प्रधान सचिव यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

राज्यातील सर्व अधिकारी, कर्मचारी तसेच स्थानिक स्वराज्य संस्था, खासगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, वरिष्ठ महाविद्यालय, आश्रमशाळा, आयटीआय येथे कार्यरत / सेवानिवृत्त शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना दिवाळी हा सण आनंदाने साजरा करता यावा, याकरिता दिनांक १८ ऑक्टोंबर २०२५ पूर्वी वेतन होणे आवश्यक आहे. त्यामुळे नेहमी शिक्षक, प्राध्यापक, कर्मचाऱ्यांच्या हितासाठी झटणारे आमदार सुधाकर अडबाले यांनी सदर कर्मचाऱ्यांचे वेतन दिवाळीपूर्वी व्हावे, याकरिता मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्याकडे मागणी केली आहे.

राज्यातील सर्व अधिकारी / कर्मचाऱ्यांचे माहे ऑक्टोंबरचे वेतन दिनांक १८ ऑक्टोंबर २०२५ पूर्वी त्यांच्या खात्यात जमा करण्याबाबत वेतन तरतूद तात्काळ उपलब्ध करून द्यावी व दिवाळीपूर्वी वेतन अदा करण्याबाबत संबंधितांना आदेश निर्गमित करण्यात यावे, अशी मागणी आमदार सुधाकर अडबाले यांनी मा. मुख्यमंत्री, दोन?ही उपमुख्यमंत्री तसेच शालेय शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण, आदिवासी विकास, इतर मागास बहु. कल्याण व कौशल्य व उद्योजकता विभागाच्या प्रधान सचिवांकडे केली आहे.

# अतिवृष्टीने १६८ रस्त्यांवरील डांबर गेले वाहून !

**गोंदिया :-** जिल्ह्यात जुलै आणि ऑगस्ट महिन्यात झालेल्या अतिवृष्टीचा फटका केवळ पिकांनाच नव्हे तर रस्त्यांनासुद्धा बसला आहे. अतिवृष्टी आणि म ुसळधार पावसामुळे जिल्ह्यातील १६८ रस्त्यांवरील डांबर पूर्णपणे वाहून गेल्याची बाब पुढे आली आहे. अतिवृष्टीमुळे जिल्हाअंतर्गत रस्त्यांची अवस्था फारच दयनीय झाली असून त्यावरून ये-जा करणे म्हणजे मृत्यूला निमंत्रण देण्यासारखे आहे. यामुळे रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी तब्बल ३४ कोटी १० लाखांचा निधी लागणार असल्याचा अहवाल जि.प.ने शासनाला पाठविला आहे.



जिल्ह्यातील रस्त्यांची स्थिती आधीच सुमार आहे. त्यातच अतिवृष्टी आणि मुसळधार पावसामुळे रस्त्यावरील डांबर वाहून गेल्याने अनेक रस्त्यांवर खड्डे पडले आहे. त्यामुळे रस्त्यात खड्डे की खड्यात रस्ता हे कळायला मार्ग नाही.

रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे अपघातांच्या संख्येतसुद्धा वाढ झाली असून यात अनेकांचा बळी गेला आहे. खराब रस्त्यांमुळे नागरिकांना दररोज खड्ड्यांतून प्रवास करावा लागत असल्याने नागरिकांनी मदाद मागायची कुणाकडे?फ असा प्रश्न निर्माण झाला आहे. दरवर्षी पावसाळ्याच्या दिवसांत रस्त्यांवर खड्डे पडतात.

गोंदिया शहरातील नवीन वस्त्यांमध्ये रस्ते नसल्याने खड्डे पडले आहेत. डांबरीकरणाचे रस्तेही उखडून जातात. केलेल्या कामाची गुणवत्ता तपासली जात नसल्याने गोंदिया जिल्ह्यातील १६८ रस्त्यांवर यमराज प्रतीक्षा करीत आहे. आता या रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी ३४ कोटी रुपयांचा निधी लागणार आहे.

**१३ पूल कोसळले**

यंदाच्या पावसाळ्यात ग्रामीण भागातील रस्त्यावर असलेले १३ पूल व तीन नाली वाहून गेल्याने त्या नवीन तयार करण्याची गरज असल्याचे जिल्हा परिषदेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने शासनाकडे पाठविलेल्या अह-वालात म्हटले आहे. खड्डे बुजविण्यावर लाखो रुपये खर्च केले जातात; मात्र समस्या जशीच्या तशीच राहते. त्यामुळे हा खर्च पाण्यात गेल्याचे चित्र आहे.

# प्रशासकीय इमारतीत आग

**गोंदिया** :- येथील जयस्तंभ चौकालगतच्या प्रशासकीय इमारतीतील दुसऱ्या माळ्यावरील सह जिल्हा निबंधक वर्ग-१ व मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयात शनिवारी (ता.४) सकाळी अकरा ते साडेअकराच्या सुमारास अच-ानक आग लागली. या आगीत संबंधित विभागातील काही दस्ताऐवज व फर्निचर जळाले. शार्टसर्कीटमुळे ही आग लागल्याचा अंदाज वर्तविण्यात येत आहे.

शनिवार, सुटीचा दिवस असल्याने प्रशासकीय इमारतीत तसाही शुकशुकाट होता. अन्य काही विभागांचे अधिकारी, कर्मचारी कर्तव्यावर होते. तथापि, सकाळी अकरा ते साडेअकराच्या सुमारास दुसऱ्या माळयावरील सह जिल्हा निबंधक वर्ग-१ व मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयातून अचानक धूर निघताना लगतच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांना दिसला. त्यांनी तत्काळ समयसूचकता दाखवून सह जिल्हा निबंधक वर्ग-१ व मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयाचा दरवाजा तोडला. त्यानंतर कार्यालयातील अग्निशमन यंत्राच्या सहाय्याने व पाण्याचा मारा करून आगीवर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न केला. काही क्षणात ही आग आटोक्यात आली. मात्र, या आगीत सदर कार्यालयातील दस्ताऐवज आणि फर्निचर जळाले. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच कार्यालयाच्या अधिकारी, कम ेचाऱ्यांनी कार्यालय गाठून पाहणी केली. शार्टसर्कीटमुळे ही आग लागल्याचा अंदाज वर्तविण्यात येत आहे.



**मोठा अनर्थ टळला...**

शनिवार, साप्ताहिक सुटी असल्यामुळे प्रशासकीय इमारतीत अधिकारी, कर्मचारी आणि अन्य नागरिकांची रेलचेल नव्हती. सह जिल्हा निबंधक वर्ग-१ व मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय बंद होते. त्यामुळे सुदैवाने मोठा अनर्थ टळला.

## वाशिम जिल्ह्यात नवे अल्पकालीन अभ्यासक्रम सुरू

वाशिम, - शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शासकीय तंत्र माध्यमिक शाळा तसेच कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित नवीन आणि लोकप्रिय अल्पकालीन अभ्यासक्रम सुरू करण्यात येत आहेत.मंगलप्रभात लोढा, मंत्री (कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, महाराष्ट्र राज्य) यांनी दि. २३ सप्टेंबर २०२५ रोजी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने ही पुढाकार घेतली आहे. तसेच, संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांच्याकडूनही आवश्यक मार्गदर्शक सूचना प्राप्त झाल्या आहेत.उद्योग ४.० युगातील तंत्रज्ञानकौशल्याच्या गरजेनुसार विद्यार्थ्यांना आणि इच्छुक उमेदवारांना आधुनिक तंत्रज्ञान व सेवा क्षेत्राशी सुसंगत प्रशिक्षण देऊन उद्योगांना आवश्यक कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

वाशिम जिल्ह्यातील एकूण ७ संस्था शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (६) आणि शासकीय तंत्र माध्यमिक शाळा (१) यामध्ये हे अल्पकालीन अभ्यासक्रम १० ऑक्टोबर २०२५ पासून प्रारंभ होणार आहेत.

# ११० गावांमध्ये आदीसेवा केंद्र कार्यान्वित

**गोंदिया :-** केंद्र सरकारने आदिवासी समाजाला मुख्य प्रव-ाहात आणण्यासाठी आणि त्यांच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक उन्नतीसाठी आदी कर्मयोगी अभियान सुरू केले. हे अभियान धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियानाशी संलग्न प्रशिक्षण कार्यक्रम आहे. त्याअंतर्गत १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत राज्यभर आदीसेवा पर्व राबविण्यात आले होते. या पर्वात आदी कर्मयोगी अभियानात समावेश असलेल्या जिल्ह्यातील ११० गावांमध्ये 'आदीसेवा' केंद्रे कार्यान्वित करण्यात आले आहे. आदिवासी बांधवांच्या समस्या आणि तक्रारींचे तातडीने निराकरण करण्यासाठी ही केंद्रे कार्यरत रा-




हणार आहे.

'आदीसेवा पर्व' विशेष मोहिमेद्वारे आदिवासी भागातील विकासाला गती आली. या मोहिम ेत गाव पातळीवर विविध उपक्रम राबवण्यात आले, ज्यात शिवारफ ेरी, महिला सभा, वॉर्ड सभा आणि घरोघरी भेटींचा समावेश होता.

शिवारफेरीद्वारे शेती आणि पर्यावरणाशी संबंधित मुद्दे समजून घेण्यात आले, तर महिला सभांमधून महिलांच्या गरजा आणि सुरक्षेच्या प्रश्नांवर चर्चा झाली. वॉर्ड सभांद्वारे स्थानिक पातळीवरील समस्या उजेडात आल्या. गावकऱ्यांच्या गरजा जाणून घेत विकास आराखडा तयार करण्यात आला. गाव विकास आराखड्यानुसार पुढील पाच वर्षात आदिवासी समाजाला आवश्यक सेवा पोहोचवण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

या आराखड्यांना २ ऑक्टोबर रोजी झालेल्या विशेष ग्रामसभेत मंजुरी घेण्यात आली आहे. प्रत्येक आदीसेवा केंद्रात दर आठवड्याला विविध अधिकारी उपस्थित राहून आदिवासी बांधवांच्या समस्या व तक्रारींचे निराकरण करणार आहे. यात ग्रामविकास, महसूल, कृषी, आदिवासी विकास विभाग आदी शासकीय यंत्रणातील अधिकाऱ्यांचा समावेश असणार आहे.

आदिवासी बांधवांच्या समस्या व तक्रारींचे निराकरण करणार आहे. ग्रामविकास, महसूल, कृषी, आदिवासी विकास विभाग आदी शासकीय यंत्रणातील अधिकाऱ्यांचा समावेश असणार आहे

# पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्ष लागवड करा

**अर्जुनी-मोरगाव :-** वृक्षारोपण ही काळाची गरज आहे. मानवी जीवनाचे भविष्य सुरक्षित करायचे असेल तर - वृक्षलागवड करून त्यांची जोपासना करून वाढविणे ही प्रत्येकाची नैतिक जबाबदारी आहे. - वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे या म्हणीप्रमाणे प्रत्येकाने कमीत कमी एका वृक्षाची लागवड करून त्याची जोप-ासना - करावी तरच आपला = भविष्यकाळ हा उज्वल होईल असे - प्रतिपादन जि. प. महिला व बालकल्याण सभापती पौर्णिमा ढेंगे यांनी केले.

तालुक्यातील इसा-पूर येथील टी पॉइंटवर सेवा पंधरवडा उपक्रमांतर्गत बुधवारी



(दि.१) वृक्षारोपण कार्यक्रमात आयोजित करण्यात आला होता. यावेळी त्या बोलत होत्या. त्यांच्या स्थानिक निधीतून इसा-पूर गावात वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला. अध्यक्षस्थानी सरपंच सरस्वता वलथरे या

होत्या. यावेळी माजी जि. प. सभापती उमाकांत ढेंगे, नव-तरुण सार्वजनिक गणेश मंडळाचे अध्यक्ष हिरालाल येरणे, संतोष रोकडे, ग्रा. पं. सदस्या नलिनी चांदेवार, शांताबाई रोकडे, महानंदा चांदेवार, लता चंदन बावणे, श्यामकला चांदेवार, कविता मेश्राम, अनिता लांजेवार, प्रमिला भावे, कल्पना लांजेवार, नलिनी भावे, महानंदा मोरेश्वर चांदेवार, मिलिंद गेडाम, प्रल्हाद चांदेवार, केवळराम शेंडे, गिरीध-ारी चांदेवार व गावकरी उपस्थित होते